सुंदर हार, बांगड्या, मंगळसूत्र, नथ, कानातील दागिने यांसह विविध अलंकार महिलांचे लक्ष वेधून घेत आहेत. त्याचबरोबर गौराईच्या सजावटीसाठी लागणारे विविध रंगांचे कापड, फुले, आकर्षक मखर आणि अन्य सजावटीच्या वस्तूही बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. काही दुकानदारांनी आकर्षक पद्धतीने सजविलेल्या गौराई मांडल्या असून, त्या पाहण्यासाठीही नागरिकांची गर्दी होत आहे.पारंपरिक पद्धतीने गौरीचे स्वागत करण्यासाठी महिला वर्गाने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. गौराईला सुंदर साडी नेसविण्यापासून ते विविध दागिन्यांनी सजविण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीची विशेष काळजी घेतली जात आहे. यंदा पारंपरिक साहित्याबरोबरच आधुनिक आणि आकर्षक सजावटीच्या वस्तूंनाही महिलांकडून पसंती मिळत आहे.गौरी-गणपतीच्या पार्श्वभूमीवर घराच्या सजावटीसाठीही विविध वस्तूंची खरेदी केली जात आहे. साडी, दागिने, पूजेचे साहित्य, फुलांची सजावट तसेच घर सजविण्यासाठी आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिक बाजारपेठांकडे वळू लागले आहेत. गणेशोत्सव जसजसा जवळ येत आहे, तसतशी पनवेलच्या बाजारपेठांमध्ये खरेदीची लगबग वाढताना दिसत आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत महिलांसह कुटुंबे मोठ्या संख्येने खरेदीसाठी बाजारात दाखल होत आहेत. त्यामुळे बाजारपेठांमध्ये सध्या सणोत्सवाचे चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गणपती बाप्पाच्या आगमनानंतर गौरीपूजनाचा सोहळाही मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे घरातील महिलांकडून गौराईच्या स्वागतासाठी विशेष तयारी केली जात आहे. दुकानदारांनीही गणेशोत्सव आणि गौरीपूजनाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून ठेवले आहे.



# श्रीवर्धनमध्ये गणेशोत्सवासाठी झेंडूची फुले दाखल

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपल्याने श्रीवर्धन येथे उत्सवाचा उत्साह ओसंडून वाहात आहे. बाप्पाच्या आगमनासाठी बाजारपेठा सजल्या असून, पूजेसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या गोंडा (झेंडू) फुलांची बाजारात मागणी वाढली आहे. मागणीत झालेली ही वाढ पाहता गोंडा फुलांचे दर चांगलेच तेजीत आले आहेत.

गणपती बाप्पाची पूजा, सजावट, आणि तोरण तयार करण्यासाठी गोंडा फुलांना अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यामुळे श्रीवर्धनच्या बाजारात पिवळ्या आणि केशरी रंगाच्या टपोऱ्या गोंडा फुलांची मोठी आवक सुरू झाली आहे. मागणीच्या तुलनेत आवक मर्यादित असल्याने विक्रेत्यांनी दरामध्ये वाढ केली आहे. सध्या बाजारात गोंडा फुले प्रतिकिलो रुपये १६० पासून १८० रुपयांपर्यंत विकली जात असून, सणाच्या दिवसात यात

> गणेशोत्सवात गोंडा फुलांना दरवर्षीच मागणी असते, परंतु यंदा ग्राहकांचा उत्साह अधिक आहे. गेल्या काही दिवसांतील हवामान बदलामुळे आवक काहीशी घटली असली, तरी आम्ही ग्राहकांसाठी ताजी फुले उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहोत. चालू दर पाहता यंदा चांगला व्यवसाय होण्याची आशा आहे. यंदा सणाच्या तोंडावर गोंडा फुलांना चांगला भाव मिळत असल्याने आमच्या मेहनतीचे चीज होत आहे.
>
> – **गणेश कुडगावकर,** फुले विक्रेता, श्रीवर्धन

# 'स्मार्ट' लूट थांबवा

(**पान १ वरुन**) माजी आ. बाळाराम पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, तालुका चिटणीस सुरेश घरत, पुरोगामी विद्यार्थी संघटना अध्यक्ष ॲड. साम्या कोरडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**दरात एवढी तफावत का?**

आकडेवारीनुसार भांडुप, कल्याण, कोकण, बारामती आणि पुणे या भागातील स्मार्ट मीटर कामासाठी अदानी एनर्जी सोल्युशन्सला सुमारे १३,८८८ कोटींचे कंत्राट देण्यात आले होते. मात्र, त्यानंतर ते जवळपास २७,७४० कोटींवर नेण्यात आले. स्मार्ट मीटर बसविण्याचा खर्च एवढा का वाढला? टेंडरमधील मूळ किंमत आणि प्रत्यक्ष मंजूर किमतीत तफावत का निर्माण झाली? याचा खुलासा सरकारने करावा, अशी मागणी शेकापने केली आहे.

**टेंडर ३,३१४ कोटींचे; मंजुरी ६,२९४ कोटींची?**




बारामती-पुणे झोनचे उदाहरण देताना मूळ टेंडर ३,३१४ कोटी, तर प्रत्यक्ष मंजूर रक्कम ६,२९४ कोटी असल्याचे समोर आले आहे. प्रतिमीटर दर ६,३१८ वरून ११,९९८ झाल्याची बाबही समोर आली आहे.

**उत्तर प्रदेशचा दाखला देत महाराष्ट्र सरकारला घेरले**

स्मार्ट मीटरच्या दरांवर प्रश्न उपस्थित करत शेकापने उत्तर प्रदेशातील निर्णयाचा दाखला दिला आहे. पक्षाच्या सादरीकरणात उत्तर प्रदेशमध्ये स्मार्ट मीटरच्या जास्त किमतीबाबत आक्षेप घेण्यात आल्याचे आणि काही प्रीपेड मीटर निविदा उच्च किमतीच्या कारणामुळे रद्द करण्यात आल्याचे नमूद आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशमध्ये जास्त दरावर प्रश्नचिन्ह, मग महाराष्ट्रात वाढीव दराला मंजुरी का? असा सवाल शेकापने केला आहे.

**जनतेच्या खिशातून वसुलीचा आरोप**

शासन निर्णयानुसार स्मार्ट मीटरसह संपूर्ण योजनेसाठी ₹३९,६०२ कोटींच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यातील ६० टक्के अनुदान केंद्राकडून आणि उर्वरित ४० टक्के रक्कम महावितरण कर्जाद्वारे उभारणार असल्याचे पक्षाने नमूद केले आहे. या कर्जाची परतफेड व्याजासह ग्राहकांकडून केली जाणार असेल, तर ग्राहकांवर नेमका किती आर्थिक भार पडणार आणि राज्य सरकारचा प्रत्यक्ष आर्थिक वाटा किती? याचा खुलासा करण्याची मागणी शेकापने केली आहे.

- **सरकारकडून ग्राहकांची फसवणूक?**
- **अदानीला टेंडर फुगवून का दिले?**
- **वाढीव बिलांच्या नावाखाली जनतेच्या खिशावर डल्ला?**
- **शेकापचा महावितरणला घणाघाती सवाल**

**कंत्राटदार की दलाल?**

स्मार्ट मीटरच्या कंत्राटात मीटर उत्पादक आणि विक्रेता कंपन्यांच्या भूमिकेवरही शेकापने प्रश्न उपस्थित केला आहे. महावितरणच्या वेबसाईटवरुन मिळालेल्या माहितीनुसार, जीनस ही मीटर उत्पादक कंपनी असून, अदानी, माँटेकॅर्लो आणि एनसीसी यांच्याबाबत विक्रेते/कंत्राटदार म्हणून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यामुळे मीटर व सुट्या भागांच्या खरेदीतील अतिरिक्त खर्चाचा भार ग्राहकांवर पडण्याची शक्यता असल्याचा दावा शेकापने केला आहे.

**स्थानिक तरुणांच्या रोजगारावर गदा?**

स्मार्ट मीटरमुळे पारंपरिक मीटर रीडिंग आणि घरपोच बिल वितरणाची कामे कमी होत असल्याने महावितरणमध्ये कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या स्थानिक तरुणांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच बेरोजगारीमुळे तरुण त्रस्त आहे. अशातच या योजनेमुळे सुमारे २५ हजार तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवरही शेकापचा सवाल**

स्मार्ट मीटरबाबत विधानसभेत चर्चा झाल्यानंतर प्रीपेडऐवजी पोस्टपेड मीटरचा मुद्दा मांडण्यात आला; मात्र प्रत्यक्षात स्मार्ट मीटरच्या सक्तीचा प्रश्न कायम असल्याचा आरोप शेकापने केला आहे. त्यामुळे सरकारची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यात फरक का? असा सवाल पक्षाने उपस्थित होत आहे.

# खारघर येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे जखमी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मुंबई-पुणे महामार्गावरील खारघर येथील बेलपाडा बसस्थानकाजवळ भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत दोन तरुण जखमी झाल्याची घटना घडली. अपघातानंतर जखमींना मदत न करता तसेच पोलिसांना माहिती न देता संबंधित वाहनचालक वाहनासह पसार झाला.या अपघातात यश चव्हाण (१९) आणि अनिरुद्ध सुरेश बागडे (१८, दोघेही रा. दिवाळे गाव) हे जखमी झाले आहेत. दोघेही मोटारसायकल क्रमांक एमएच ४६ डीके ३०९६ वरून दिवाळे येथून बेलपाडा, खारघर येथील महाविद्यालयात जात होते. बेलपाडाकडे जाणाऱ्या मार्गावर बेलपाडा बसस्थानकासमोर त्यांची दुचाकी आली असता भरधाव अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोन्ही तरुण रस्त्यावर कोसळून जखमी झाले. मात्र, अपघातास कारणीभूत ठरलेला चालक घटनास्थळी न थांबता वाहनासह पसार झाला.

अपघाताची माहिती मिळताच जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरोधात कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलिसांकडून अपघाताचा अधिक तपास करण्यात येत आहे.

# तळोजात आयुष्मान-आभा कार्ड शिबीर

**| पनवेल | प्रतिनिधी |**

माँसाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका प्रगती कैलास पाटील यांच्या पुढाकाराने तळोजा येथे आयुष्मान कार्ड व आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेल्या या शिबिराला तळोजावासियांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.



सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ सहज उपलब्ध व्हावा, तसेच आरोग्यविषयक डिजिटल नोंदी तयार करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात नागरिकांना आयुष्मान कार्ड तसेच आभा कार्डबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आणि नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून देण्यात आली.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि सर्वसामान्य कुटुंबियांनी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. आरोग्याशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे नागरिकांची मोठी गैरसोय टळली. 'नागरिकांची सेवा हीच खरी सामाजिक बांधिलकी' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.

शिबिराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा नागरिकांच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि संबंधित सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल प्रगती कैलास पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

# विनयभंग प्रकरणातील आरोपीवर कठोर कारवाई करा

## ग्रामस्थांची मागणी; आंदोलनाचा इशारा

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

नांदगाव येथील सुरुळपेठ परिसरात ५ सप्टेंबर रोजी रात्री एका महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, आरोपीवर कठोर कलमे न लावल्याने तो लवकर सुटल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

या प्रकरणात राजेश ऊर्फ पप्या ठाकूर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, घरात बेकायदेशीर प्रवेश केल्याप्रकरणी कलम ३२९ तसेच अन्य संबंधित कठोर कलमे लावणे आवश्यक होते, अशी मागणी यशवंत पाटील, सरपंच शरद खेडेकर आणि ग्रामस्थांनी केली आहे.




आरोपीने यापूर्वीही गावात अशा प्रकारचे प्रकार केल्याचा दावा ग्रामस्थांनी केला असून, या प्रकरणात कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. पोलिसांनी योग्य ती कारवाई न केल्यास ग्रामस्थांना सोबत घेऊन जनआंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

दरम्यान, मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सांगितले की, गुन्हा दाखल होताच आरोपीला अटक करून ताब्यात घेण्यात आले. पीडित महिलेने दिलेल्या माहितीनुसार प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला असून, तक्रारीची प्रत अलिबाग येथील सरकारी वकिलांकडे पाठवून त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे. दाखल गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेचे कलम ७६ देखील समाविष्ट करण्यात आले असून, पोलिसांनी कायद्यानुसार योग्य ती कारवाई केली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# हरिश्चंद्र पाटील यांचे निधन

**| अलिबाग | शहर प्रतिनिधी |**



तालुक्यातील सागाव येथील सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र लक्ष्मण पाटील उर्फ नथुराम सावकार यांचे शुक्रवारी (दि.४) निधन झाले. निधनसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. हरिश्चंद्र पाटील शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या जवळचे होते. त्यांच्या निधनाने सागावसह समस्त शेकाप आणि इतर कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

# वडवली-दिवेआगर मार्गावर अपघातांचा धोका

**| कापोली | प्रतिनिधी |**

वडवली-वाकडा पूल ते गोंडघर पेट्रोल पंपादरम्यानच्या मुख्य रस्त्यावर रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य पसरले असून, बंद पथदिवे आणि मोकाट जनावरांमुळे चालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर रात्रीच्या वेळी घोडे तसेच जनावरे रस्त्यावरच फिरताना आढळत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

रस्त्यावर पुरेसा प्रकाश नसल्याने अंधारात उभी असलेली जनावरे वाहनचालकांना वेळेवर दिसत नाहीत. त्यामुळे अचानक समोर आलेल्या जनावरांवर धडक होऊन वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच चालक गंभीर जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. जनावरांच्या मालकांनी त्यांना मोकाट सोडू नये, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पथदिव्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेपर्यंत मोकाट जनावरे व घोड्यांच्या गळ्यात रात्री प्रकाश परावर्तित करणारे पट्टे बांधण्यात यावेत, अशी सूचना नागरिकांनी केली आहे. हा प्रश्न केवळ स्थानिक पातळीवर न ठेवता आमदार, खासदार आणि संबंधित मंत्र्यांनी त्याची गंभीर दखल घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

# शासनाच्या बदलत्या धोरणांचा शिक्षकांना फटका

## बाळासाहेब माने यांचे प्रतिपादन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

मराठी ही आपली मातृभाषा व संस्कारांची भाषा आहे. तिचे पावित्र्य जपणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. शासनाच्या बदलत्या धोरणांचा सर्वाधिक फटका शिक्षकांना बसत आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे सचिव प्रा. बाळासाहेब माने यांनी केले.



महासंघ, रायगड विभागाच्या वतीने मराठी विषयात विशेष गुण मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व काव्य मैफल रविवारी दापोली-पारगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर कनिष्ठ महाविद्यालयात झाली. अध्यक्षस्थानावरून प्रा. माने बोलत होते. जिल्हाध्यक्ष प्रा. रेखा कटके यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.

प्रा. किशोर पाटील यांनी मराठी संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. प्रा. संजय पाटील यांनी दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढविण्याचे सांगितले. संजीवनी म्हात्रे यांनी साहित्यिक उपक्रम व मराठी भाषा संमेलने आयोजित करण्याची गरज व्यक्त केली. पत्रकार कृष्णा पाटील यांनी मराठी भाषा, संस्कृती व आर्थिक साक्षरतेवर विचार मांडले.

यावेळी प्रा. प्रवीण कुमार पाटील, प्राची हाटे, प्रा. गव्हाण, प्रा. धनंजय भोसले, प्रा. शिरसाठ, प्रा. पठाण, प्रा. वडितके, एस. एस. खिराडे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. शेळके कीर्तीदा यांनी केले, तर प्राची हाटे यांनी आभार मानले.

**प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्त्यांची दुरवस्था | कर्जतच्या खड्डेमय रस्त्यांविरोधात पोलीस मित्र संघटना आक्रमक**

# बाप्पाची मूर्ती मांडीवर घेत खड्ड्यात बसून आंदोलन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील खड्डेमय रस्त्यांच्या प्रश्नावर पोलीस मित्र संघटनेने आक्रमक भूमिका घेतली असून, संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी कर्जत येथील श्रीराम पुलाजवळ रस्त्यावरील पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बसून आंदोलन सुरू केले आहे. विशेष म्हणजे, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या मांडीवर गणपती बाप्पाची मूर्ती ठेवून हे अनोखे आंदोलन करण्यात येत असल्याने त्याची तालुक्यात चर्चा सुरू आहे.



कर्जत तालुक्यातील मुख्य तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता, अशी परिस्थिती निर्माण झाल्याने वाहनचालक आणि नागरिक त्रस्त आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी पोलीस मित्र संघटनेने प्रशासनाकडे केली होती. मात्र, मागणीची दखल न घेतल्याने संघटनेने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

> कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी आम्ही अभियान सुरू केले आहे. शासनाच्या संबंधित विभागांनी रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवले नाहीत, तर आम्ही उल्हास नदीत जलसमाधी घेण्याचा इशारा दिला आहे. यावेळी गणपती बाप्पाची मूर्तीही सोबत असेल. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी.
>
> – रमेश कदम, आंदोलनकर्ते

मांडवणे-हेदवली मार्ग, कडाव तलाव ते टाटा रस्त्याला जोडणारा मार्ग, कर्जत-मुरबाड मार्गावरील वंजारवाडी परिसर, सावळा फाटा-सावळे-हेदवली मार्ग, हेदवली मुख्य रस्ता, कडाव-वैजनाथ-मांडवणे मार्ग तसेच आंबोट-गौळवाडी रस्त्यासह अनेक मार्गांवर खड्डे पडले आहेत. यापूर्वीही रमेश कदम यांनी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आंदोलन केले होते. सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, एमएमआरडीए आणि जिल्हा परिषद यांच्या अखत्यारीतील रस्त्यांच्या प्रश्नासाठी संघटनेने आंदोलन केले होते. मात्र, निकृष्ट काम आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पुन्हा रस्त्यांची दुरवस्था झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या आंदोलनाला पोलीस मित्र संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष दशरथ मुने यांच्यासह कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. कर्जत पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोनेंनी आंदोलनकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, रस्त्यांची दुरुस्ती होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका संघटनेने घेतली आहे.

# गणेश घाटावर आढळला महिलेचा मृतदेह

**| पनवेल | प्रतिनिधी |**

तळोजा फेज-१ परिसरातील गणेश घाट येथे पाण्यात एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतदेह काही दिवसांपासून पाण्यात असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, तो फुगलेल्या अवस्थेत आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह पाण्यातून बाहेर काढून ताब्यात घेतला असून, शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत पोलिसांकडून विविध शक्यता तपासल्या जात आहेत. दरम्यान, पोलिसांनी तपासाला सुरुवात केली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, बेपत्ता व्यक्तींच्या नोंदी आणि अन्य उपलब्ध पुरावे तपासण्यात येत आहेत. मृत महिलेची ओळख पटविण्यासाठीही पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

# लाडक्या बहिणींचे भाऊ!

हिंदूंच्या सणांची चोरी झाली आहे. दिवसाढवळ्या हे घडले आहे, घडत आहे. मात्र याबाबत खऱ्या हिंदूंना बोलण्याचीही चोरी झाली आहे. शनिवारी दहीहंडीचा उत्सव साजरा झाला. मुळात हा खरे तर कोकण आणि मुंबईचा उत्सव. आता राज्यात आणि देशातही पसरू लागला आहे. नीट पाहिले तर असे दिसेल की हिंदूंचे खऱ्या आनंदाचे जे मोठे सण आहेत त्यात धार्मिक किंवा देवाच्या पूजेअर्चेचा भाग कमी असतो. दिवाळी किंवा होळी या सणांमध्ये देवाधर्माच्या गोष्टी नावाला आहेत. खरेदी, खाणेपिणे, एकमेकांना भेटणे हे मुख्य आहे. होळी हा दुसरा असाच सण. त्यातही परस्परांना रंग लावणे हाच गाभा आहे. त्यामुळे यात कोणत्याही जातिधर्माचे लोक आपापल्या परीने सहभागी होऊ शकतात. गणेशोत्सवात गणपतीची पूजा असली तरी त्या निमित्ताने होणारे कार्यक्रम वगैरेंना अधिक महत्व होते. दहीहंडी नावाचा प्रकार तर निव्वळ मजेचा खेळ आहे. किंवा पूर्वीपर्यंत होता. कोणत्याही जाती, धर्म, प्रांताचे लोक त्यात सहभागी होऊ शकतात. पण आता या सणांचे व्यापारीकरण झाल्यापासून त्यातला उत्साहाचा, आनंदाचा आत्मा मारला जाऊ लागला आहे. कालच्या दहीहंडीतून ही बाब प्रकर्षाने समोर आली व सोशल मिडियातून त्यावर बरीच चर्चा झाली. गेली किमान १५ वर्षे मुंबईमध्ये आठ किंवा नऊ थरांचे गोविंदांचे मनोरे उभारण्याच्या स्पर्धा आणि त्यासाठी लाखालाखांची बक्षिसे हा प्रकार रुढ झाला आहे. ठाण्यात प्रताप सरनाईक, जितेंद्र आव्हाड, घाटकोपरमध्ये राम कदम अशा राजकारण्यांनी हा प्रकार सुरू केला. मग त्यात बाकीची मंडळी उतरली. मग गर्दीला आपल्याकडे खेचण्यासाठी नको नको ते प्रकार सुरू झाले. हिंदी सिनेमातल्या नटनट्यांना स्टेजवर आणणे सुरू झाले. रेन डान्स करण्यासाठी गर्दीवर पाणी फवारले जाऊ लागले. आता गेल्या काही वर्षात त्याहून पुढची पायरी गाठली गेली असून गोविंदाच्या स्टेजवरून बायकांना नाचवले जात आहे. आणि यामध्ये स्वतःला लाडक्या बहिणींचे भाऊ म्हणवणारे सर्वात आघाडीवर आहेत.

## ओंगळ धंदे

नुकत्याच झालेल्या उत्सवाचे व्हिडिओ अनेकांनी पाहिले असतील. ठाणे, घाटकोपर आणि बोरीवलीतील शिंदे गटाच्या आमदारांच्या दहीहंडी उत्सवांचे हे व्हिडिओ आहेत. स्टेजवर कोणी नर्तकी अत्यंत अश्लील अशी नृत्ये हजारो तरुणांच्या समोर करीत आहेत आणि पडद्यावरून त्यांचे हवे तसे दर्शन लोकांना घडवले जात आहे. एकेकाळी हिंदी सिनेमाच्या सेन्सॉरनेही कात्री लावली असती अशी उत्तान दृश्ये प्रत्यक्ष दिवसाढवळ्या पुन्हा पुन्हा सादर केली जात आहेत. हा सगळा ओंगळ कारभार हिंदूंच्या सणाच्या नावाने आणि कलेच्या नावाखाली चालू आहे. यातल्या बहुतांश स्टेजवर एकनाथ शिंदे यांचे मोठमोठे कटआउट्स लावलेले दिसले. याच शिंदेंच्या काळात लाडकी बहीण योजना सुरू झाली. तिच्यात लाखो अपात्र बहिणींना हजारो कोटी रुपये वाटले गेले. त्याच्या जिवावर यांनी निवडणुका जिंकल्या. तरीही आपण जणू महिलांचे उध्दारक आहोत अशा थाटात शिंदे आणि त्यांचे सहकारी बोलत असतात. भाजपवाले हे यामधले त्यांचे साथीदार. म्हणूनच शिंदेभाऊंना स्पर्धा करायला देवाभाऊ हे नामाभिधान पुढे आणले गेले. आता याच शिंदेभाऊ आणि देवाभाऊंच्या राज्यात गोकुळाष्टमीसारख्या सणाला कोट्यवधी लोकांच्या साक्षीने कॅब्रे नृत्याचे जाहीर प्रयोग केले जात आहेत. त्याला भाऊंच्याच सहकाऱ्यांनी प्रायोजित केले आहे. हे भाऊ या व्यासपीठावर येऊन वा, वा, छान छान करीत आहेत. उद्या पुन्हा हेच भाऊ दुसरीकडे महिलांचे मेळावे घेऊन जोतिबा, सावित्री वगैरे नावेही घेतील. नवरात्रात देवीच्या देवळात जातील किंवा मंडपात देवीची पूजा करून आपण कसे भक्त आहोत याचे प्रदर्शन करतील. ठाण्यातला आनंद दिघे यांचा टेंभी नाक्याचा नवरात्रौत्सव प्रसिध्द आहेच. त्याचा ताबा याच लोकांकडे आहे. एकीकडे गोकुळाष्टमीला महिलांना पैशांसाठी देहप्रदर्शन करायला लावायचे आणि दुसरीकडे महिलाशक्तीचे गोडवे गायचे असा हा सगळा ढोंगीपणा आहे. पैसा आणि सत्ता हातात आहे याच्या जोरावर एकीकडे गोविंदा आणि दुसरीकडे बायका यांना नाचवण्याचे आणि लोकांना गुंगीमध्ये ठेवण्याचे हे राजकीय मतलबी धंदे आहेत. यांच्या घरातल्या लेकीसुना, नाती यांना हे स्टेजवर येऊन अशा प्रकारची नृत्ये करायला पाठवतील काय असा सवाल करण्याची आता वेळ आली आहे.

## यांच्या माथी हाणा काठी

गर्दी नादाला कशी लावता येईल एवढा एकच हिशेब यांच्या डोक्यात चालू असतो. यापुढे यांना धर्म, संस्कृती यांचे काहीही पडलेले नाही. याचे समाजावर काय परिणाम होतील याची यांना काहीही चिंता नाही. सत्ता मिळवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी हे कोणत्याही थराला जाऊ शकतात. खरे तर धर्म ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे. मी कोण आहे आणि माझे या मर्त्य जगात काय प्रयोजन आहे या गोष्टींचा शोध घेण्यातून श्रध्दा, भाव, भक्ती, धर्म या गोष्टींचा विस्तार झाला आहे. हिंदू परंपरेमध्ये या संदर्भात खूप चिंतन आहे. आपल्या सणांमध्ये व उत्सवांमध्येही त्याचा काही अंश उतरलेला आहे. गणपती नावाच्या देवाला काही दिवसांसाठी घरी आणणे, त्याच्या मूर्तीत प्राण फुंकणे आणि काही दिवसांनी ती विसर्जित करणे यात एक वेगळा अर्थ आहे. मात्र तो खासगीरीत्या घरात साजरा केला तरच त्या त्या माणसाला जाणवू शकतो असा आहे. कृष्णाष्टमीची हंडी, काला यातही असेच काही अर्थ दडलेले आहेत. कृष्ण आणि त्याच्या मित्रांनी पाऊस पाडणाऱ्या इंद्र नावाच्या राजाला दिलेले आव्हान, काठ्यांनी पर्वत उचलणे ही भावना आणि गोविंदांनी मनोरे रचणे ही कसरत यात एक नाते आहे. पण आजच्या काळात हे नाते वा भावना समजून घेण्याची कोणालाही उसंत नाही. आणि ती मिळू नये आणि तुम्ही गोंगाटात बुडून जावे अशी व्यवस्था लाडके भाऊ म्हणवणारे सत्ताधीश करीत आहेत. पुण्यातील डीजेचा वादही अशाच प्रकारचा आहे. वास्तविक डीजे नावाच्या कान बधीर करून टाकणाऱ्या यंत्रणेवर सत्ताधारी लोकांनी स्वतःहून बंदी घालायला हवी. पण यांच्याच कार्यकर्त्यांनी कोट्यवधी रुपये खर्चून गावोगावी डीजेचे धंदे सुरू केलेले आहेत. शिवाय महिन्याला एकदा तरी कोणत्या ना कोणत्या निमित्ताने हे डीजे वाजवून लोकांना गुंगवून ठेवणे हीच याची कल्पना आहे. याला विरोध केला की तुम्ही आमच्या श्रध्देचा वा भावनांचा अपमान करता आहात अशी बोंब ठोकली जाते. यात पुण्याचे कथित गणेशभक्त असतात तसेच ठिकठिकाणचे आंबेडकर आणि अण्णाभाऊ भक्तही असतात. पुण्यात या डीजेविरुध्द तसेच रस्ते अडवून सण साजरे करण्याविरुध्द रविवारी एक मोर्चा निघाला. पुण्यातील आणि ठाण्यातील भाजपचे भक्तदेखील या डीजेंच्या विरोधात आहेत. तरीही शिंदे आणि देवाभाऊ त्यांना दाद देत नाहीत, यावरूनच त्यामागील अर्थकारण व राजकारण लक्षात यावे. गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीतही आता काही ठिकाणी दहीहंडीप्रमाणे बायका नाचवण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. सत्तेतले लाडके भाऊ आपल्या गुर्मीत आहेत. पण त्यांच्या कोट्यवधी बहिणी आणि त्यांचे कुटुंबीय हे तरी ताळ्यावर आहेत का असा सवाल आहे. त्यांनी केवळ खासगीमध्ये नाराजी व्यक्त करीत न बसता या सत्तेतल्या भावांच्या डोक्यात तुकोबांसारखी काठी हाणण्याची गरज आहे.

---

**| विचार**

# किनारपट्टीकडे बारीक लक्ष हवे

**प्रवीण दीक्षित**

*भारताला लाभलेली हजारो किलोमीटरची किनारपट्टी देशाचा अभिमान असली तरी सध्या तिथे होत असलेले लोकसंख्याविषयक बदल चिंताजनक ठरत आहेत. शेजारील राष्ट्रांना सागरी मार्गाने भारतात शिरणे अतिशय सोपे असून भारतविरोधी शक्ती याचा गैरफायदा घेऊ शकतात. सुरक्षा यंत्रणांना अद्ययावत साधने, शस्त्रे आणि बोटी दिल्या तरी या भागात काम करणाऱ्या माणसांचे काय हा प्रश्नच आहे.*

कोकणातल्या लोकप्रतिनिधींनी कोकणातील लोकसंख्याविषयक बदलाचा मुद्दा अनेकदा मांडला आहे; पण या महत्त्वाच्या मुद्द्याकडे आजवर पुरेशा गांभीर्याने पाहिले गेले नाही. खरे तर हा केवळ राजकीय मुद्दा म्हणून सोडून न देता त्याकडे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने पाहिले जायला हवे. कोकण किनारपट्टीलगतची जमीन मोठ्या प्रमाणावर धनवान लोकांना विकली जात आहे. जमिनी विकत घेणारे हे लोक कोण आहेत, ते नेमके काय उद्योग करतात, त्यांच्याबरोबर येणारे लोक कोण आहेत, याबद्दल कोणाकडेच खात्रीशीर माहिती नसते. त्यामुळे कोकणातील स्थानिक लोकांनीदेखील केवळ चांगली रक्कम मिळते म्हणून कोणालाही जमीन विकणे आणि नंतर काही झाले तर हात वर करणे थांबवायला हवे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मत्स्य व्यवसायाच्या निमित्ताने अनेक बोटी किनारपट्टीवर येतात. या बोटींचे मालक कोण आहेत याबद्दलची माहिती उपलब्ध असते; पण बोटीवर काम करणारे खलाशी आणि इतर व्यक्ती भारतीय आहेत, बांगलादेशी आहेत, म्यानमारचे आहेत, रोहिंग्या आहेत किंवा नेपाळी आहेत, हे स्पष्ट नसते. त्यांच्याकडे कोणतेही ओळखपत्र नसते. नाविक दल, कोस्ट गार्ड किंवा पोलिसांतर्फे अशा लोकांना हटकले जाते तेव्हा बोटीवरील खलाशी कोण आहेत याचा काहीच उलगडा होत नाही. त्यामुळे या लोकांनी त्यांच्या देशाचे ओळखपत्र जवळ बाळगायला हवे. पण बहुतेक वेळा हे लोक अनधिकृतपणे आपल्या देशात शिरतात. त्यानंतर ते भारतीय नागरिक आहेत की बाहेरचे आहेत हे शोधणे अवघड होते. यातील बहुतांश लोक आधार कार्डसारखी ओळखपत्रे तयार करून घेतात. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

आणखी महत्त्वाची बाब म्हणजे कोकणातील स्थानिक नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने कोकणाबाहेर स्थायिक झाले आहेत. एकूणच किनारपट्टीच्या भागात लोकसंख्याविषयक बदलाची समस्या निर्माण झाली आहे. स्पष्टच बोलायचे झाल्यास अनेक मुस्लिमधर्मियांनी अशा जागांवर कब्जा मिळवला आहे. या भागात चोरटी आयात (स्मगलिंग), अमली पदार्थांची तस्करी अशी बेकायदेशीर कामे चालतात आणि त्यात ही मंडळी अल्पसंख्यांक संबंधांचा गैरफायदा घेतात. अशा लोकांमुळे आपली राष्ट्रीय सुरक्षा किती मजबूत आहे याचा राष्ट्रीय पातळीवर विचार होणे गरजेचे आहे. सुरक्षा यंत्रणांना ड्रोन्स, अत्याधुनिक शस्त्रे, बोटी आणि अद्ययावत तंत्रज्ञान दिले तरी किनारपट्टीच्या भागात काम करणारी ही माणसे राष्ट्रीय विचारांची आहेत का आणि त्यांच्यात राष्ट्रीय विचार निर्माण करण्याचे प्रयत्न कोण करत आहे का, हा मुख्य मुद्दा आहे. काही घडले किंवा काही घडणार असल्याची माहिती मिळाल्यावर सुरक्षा यंत्रणा कारवाई करणार. पण या बाबतीत केवळ 'रिॲक्टिव्ह' न राहता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काय केले पाहिजे यावर विचार व्हायला हवा. एका बाजूला आपण आपल्या देशाच्या सीमांवर कुंपण घालून ती अभेद्य करण्याचा प्रयत्न करतो; पण त्याच वेळी हजारो किलोमीटर्सची सागरी सीमा मात्र देशाच्या शत्रूंसाठी मोकळी सोडतो. या भागात मशिदी, मदरसे का वाढत आहेत, तिथली 'डेमोग्राफी' का बदलत आहे यावर गांभीर्याने विचार कधी होणार हा मुख्य मुद्दा आहे. देशात आणि किनारपट्टी लाभलेल्या राज्यांमध्ये कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी यावर एका विचाराने काम होणे गरजेचे आहे.

पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका हे देश समुद्रामार्गे आपल्या इतके जवळ आहेत, की ते या कमी अंतराचा गैरफायदा केव्हाही घेऊ शकतात. दहशतवादी, स्मगलिंग करणारे, ड्रग माफिया किंवा अवैध शस्त्रव्यापार करणारे यांना भारतात शिरण्यासाठी हा सोपा मार्ग आहे. त्यामुळे सागरी सुरक्षेकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. निसर्गाने भारताला तीन बाजूंनी समुद्राचे फार मोठे वरदान दिले आहे. समुद्रातून होणारा व्यापार, समुद्रातील जलजीव तसेच समुद्राच्या तळाशी असलेले तेल, खनिजे हे भारताच्या आर्थिक प्रगतीचे महत्त्वाचे स्रोत आहेत. भारतातील मत्स्यव्यवसाय आज निर्यातीमध्ये अत्यंत महत्त्वाचा हिस्सा बनला आहे. या आणि अशा अनेक उलाढाली तसेच समुद्रमार्गे इतर देशांशी होणारा व्यापार सतत वाढत आहे. समुद्राचे आर्थिक प्रगतीतील स्थान महत्त्वाचे असल्यानेच भारताविरुद्ध कारवाई करणाऱ्या शत्रू देशांनी सागरी सुरक्षा भेदण्याचे आणि भारतात अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करण्याचे प्रयत्न वारंवार केले आहेत. १९९३ मध्ये दाऊद इब्राहिम आणि त्याच्या टोळीने रायगड जिल्ह्यातील मुरुड, म्हसळा, श्रीवर्धन येथील किनारपट्टीवरून अत्यंत घातक असे आरडीएक्स आणून मुंबईमध्ये बॉम्बस्फोट करून शेकडो लोकांचे बळी घेतले होते. या हल्ल्याच्या खुणा लक्षात असतानाच २००८ मध्ये पाकिस्तानने मुंबईमध्ये सशस्त्र दहशतवादी पाठवून दक्षिण मुंबईत हाहाकार माजवला होता. त्यातही शेकडो निरपराध लोकांचे बळी गेले. याशिवाय समुद्रमार्गे आलेली अमली पदार्थांची पाकिटे अनेक वेळा ठिकठिकाणी सापडली आहेत. अशा प्रकारे दहशतवादी येणे, शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी करण्याचे प्रकार वारंवार नजरेस आले आहेत.

किनारपट्टीवर मत्स्यव्यवसाया व्यतिरिक्त अन्य रोजगार उपलब्ध नसल्याने वर्षानुवर्षे येथील विशेषतः पुरूषवर्ग मुंबईकडे आकर्षित होत आहे. १५ ते ६० या वयोगटातील पुरूष रोजगारासाठी आपला भाग सोडून जात आहेत. मत्स्यव्यवसाय असो वा आंबे, नारळ सुपारीचा व्यवसाय, त्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असते. पारंपारिक कोकणी माणूस या उद्योगांना उपलब्ध नसल्याने सुदूर अशा नेपाळ, बांगलादेश, म्यानमार येथील व्यक्ती कोकणात दाखल होत आहेत. कोकणात येणाऱ्या गुंतवणुकीस योग्य कुशल आणि अकुशल कामगारांची चणचण भरून काढण्यासाठी कोकण सोडून अन्य ठिकाणचे लोक किनारपट्टीवर पोहोचत आहेत. संपूर्ण किनारपट्टीवर आता परधर्मीयांचे वर्चस्व निर्माण होत आहे. किनारपट्टीवरील बंदर विकास, महामार्गांचे जाळे, कोकण रेल्वे या निमित्ताने बाहेरून येणाऱ्या व्यक्तींच्या येण्याचा उद्देश, इतिहास फारच क्वचित तपासून पाहिला जातो. ड्रग माफिया, तस्करी करणाऱ्या व्यक्ती, दहशतवादी त्याचा गैरफायदा घेऊन देशविघातक कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सागरी सुरक्षेबरोबरच किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या 'डेमोग्राफिक चेंजेस'कडे बारकाईने लक्ष देऊन सुरक्षेचे उपाय योजणे आवश्यक आहे. हीच परिस्थिती अन्य राज्यांमध्येही दिसून येते. तिथेही किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मुस्लिम लोकसंख्या वाढत आहे. त्यासाठी काही महत्त्वाच्या सूचना लक्षात घ्यायला हव्यात.

सागरी सुरक्षेसाठी नेमलेल्या पोलीसांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा कितपत उपयोग करून घेतला जात आहे, याची सतत तपासणी करणे गरजेचे आहे. गुजरातमधील ओखा येथे भारत सरकारतर्फे चालवलेल्या अकादमीमध्ये महाराष्ट्रातील केवळ दहा लोकांना एका प्रशिक्षण वर्गात भाग घेता येतो. हे प्रशिक्षण अतिशय तोकडे असल्याने महाराष्ट्रातील सागरी पोलिसांसाठी स्वतंत्र आकादमीची व्यवस्था तातडीने होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सागरी सुरक्षा दलात भाग घेणाऱ्या स्थानिक व्यक्ती आणि मरीन होम गार्डस यांनाही प्रशिक्षित करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून सतर्क करण्याची गरज आहे. कोकणातील संपूर्ण किनारपट्टीवर, जेट्टी, बंदरे व विशेषतः सुदूर पसरलेल्या खाड्यांच्या बाजूला सौर विद्युत चलित कॅमेरे बसवण्याची आवश्यकता आहे. त्यात फेशियल रेकग्निशनची सोय देऊन संशयित व्यक्तींची हालचाल टिपून आवश्यकतेप्रमाणे कारवाई करता येईल. पोलीसांना पुरवलेल्या हायस्पीड बोटी समुद्रातील वाढत्या प्लॅस्टिकच्या कचऱ्यामुळे नादुरुस्त होत आहेत. अशा नादुरुस्त बोटी परत सुरू करण्यासाठी प्रदीर्घ वेळ लागतो. त्यामुळे आवश्यक गस्त घालण्यामध्ये अडथळे निर्माण होतात. या बोटी दुरूस्त करण्यासाठी प्रशिक्षित आणि कुशल कामगारही ठिकठिकाणी असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सागरी सुरक्षा दलाच्या मदतीने लोकांमध्ये वारंवार प्रबोधन करण्याची गरज आहे. किनारपट्टीवर वाढणाऱ्या मशिदी, त्यासाठी येणारा निधी तसेच परप्रांतातून आणि अन्य देशांमधून येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आणि त्यांच्या इतिहासाची सखोल पडताळणी करणे आवश्यक आहे. या भागात वारंवार 'इज्तेमा'च्या निमित्ताने अन्य भागातील तसेच परदेशी मुस्लिमधर्मिय येत असतात.

जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट हे आज व्यापाराचे अत्यंत प्रमुख बंदर बनलेले आहे; परंतु या बंदरातून तसेच कांडला येथील बंदरातूनही गेली काही वर्षे अन्य सामानाबरोबर लपवून काही टन अमली पदार्थ भारतात पाठवले गेले आहेत, असे दिसते. त्याचबरोबर या बंदरांमधून हवाला मार्गाने भारतीय चलन पाठवणे, बंदी असूनही रक्तचंदनाची मोठ्या प्रमाणात निर्यात करणे असे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यातून देशांतर्गत सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाल्याचे दिसते. विशेष स्कॅनर्स वापरून बंद कंटेनर्सची सखोल तपासणी केल्याशिवाय आयात केलेला माल भारतात येऊ दिल्याने सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होत असतो. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित श्वान पथके आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांच्याबरोबर समन्वय वाढवण्याची आवश्यकता आहे, सुरक्षा यंत्रणा, कस्टम्स विभागातील अधिकारी कर्मचारी यांच्यात चालणाऱ्या भ्रष्टाचाराचा देशविघातक शक्ती आणि परकीय शत्रूसंस्था गैरफायदा घेऊन शस्त्रे, अमली पदार्थ, स्फोटके पाठवण्यात वेळोवेळी यशस्वी झाल्याचे दिसते. हे लक्षात घेऊन त्या संवेदनशील ठिकाणी नेमल्या जाणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करण्यापूर्वी आणि नेमल्यानंतर पडताळणी करण्याची गरज आहे.

बंदरे, जेटीकडे जाणाऱ्या रस्त्यांवर ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या सहाय्याने सतत लक्ष देणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून कोणतीही संशयित हालचाल लक्षात आल्यास त्वरीत उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राशिवाय अन्य १३ राज्यांमध्येही सागरी सुरक्षेसाठी विविध प्रयत्न सतत सुरू आहेत. त्या सर्व संबंधित संस्थांबरोबर उपलब्ध माहिती आणि त्यांनी केलेले उपाय याबाबतचा समन्वय राखणे महत्त्वाचे आहे. केंद्र सरकार, सर्व संबंधित राज्ये आणि सर्व सुरक्षा यंत्रणा यांनी सतर्कपणे केलेल्या प्रयत्नातून भारताची सागरी सुरक्षा अभेद्य होऊ शकेल, यात संशय नाही.

---

**| चर्चा आजची**

# एकवीस वर्षाची प्रतिक्षा संपली

**प्रमोद जाधव**

अलिबागच्या मानाच्या दहीहंडीचा जल्लोष रविवारी पहाटे पर्यंत पहायला मिळाला. पावसाच्या सरी, अलोट गर्दी, गोविंदाच्या उत्साहाने या सोहळ्यामध्ये शेवटपर्यंत रंगत आणली होती. अखेर नऊ थर रचून विक्रम करणाऱ्या अलिबागमधील मेटपाडा गोविंदा पथकाने दहीहंडी फोडून मानाची गदा आणि दोन लाख ५१ लाख रुपयांचे बक्षीस मिळविण्याचा मान मिळविला. २१ वर्षाच्या दिर्घ प्रतिक्षेनंतरही संधी मिळाल्याने अलिबागकरांनी जल्लोष साजरा केला. दरम्यान ग्रामीण भागातील भोनंग- फणसापूरमधील जय हनुमान महिला गोविंदा पथकानेदेखील मानाची दहीहंडी फोडून अंतिम विजेतेपद पटकावले आहे. मानाची गदा आणि एक लाख एक हजार रुपयांचे बक्षीस देऊन या विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

पारंपारिक ढोल ताशांच्या गजरातून दहिहंडी उत्सवाच्या सोहळ्याचा शुभारंभ सायंकाली झाला. पारंपारिक वाद्यातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविले.रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्यासह, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, नगराध्यक्षा अक्षया नाईक, महिला आघाडी प्रमुख तथा उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नारळ वाढवून या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले.

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग आणि प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित अलिबागमध्ये मानाच्या दहीहंडीच्या उत्सवाची २४ वर्षाची परंपरा जपण्यात आली. दुपारी अडीच वाजल्यापासून अलिबागमधील शेतकरी भवन परिसरात नागरिकांनी जमण्यास सुरुवात केली. अनेक वर्षाची परंपरा असलेला उत्सव पाहण्यासाठी अलिबागमध्ये काही तासातच अलोट गर्दी झाली.सायंकाळी पाच वाजल्यापासून सुरु झालेल्या या सोहळ्यामध्ये उंच थरांसाठी गोविंदा पथकांची चुरस दिसून आली. गाण्याचा ताल, आणि एकावर एक थरातून सलामी, यामुळे दहिहंडीचा उत्साह, गोविंदाचा जल्लोष द्विगुणीत झाल्याचे पहावयास मिळाले. दरम्यान कुलाबा ढोल पथकाच्या आवाजाने संपुर्ण परिसर दुमदूमन गेला.

अलिबाग नगरपरिषदेचे बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनातून हा सोहळा राबविण्यात आला. डिजेचा ठेका, दहीहंडी सोहळ्यावर सुमधूर अशी हिंदी मराठी गाणी, विजेचा झगमगाट, शिस्तबध्द नियोजन, फुलांनी आणि विद्यूत रोषणाईने सजवलेली आकर्षक अशी उंचावरील दहीहंडी, गोविंदा पथकांच्या सुरक्षेसाठी उचलेले पाऊल, गठित केलेल्या समितीचे सभासद जबाबदारीने सांभाळत असलेले काम या सर्वच गोष्टीमुळे दहिहंडीचा उत्सव प्रेक्षकांना वेगळा आनंद देत होता. अनेकांनी आपल्या मोबाईलच्या कॅमेरातून दहिहंडीचे छायाचित्र कैद करण्याचा प्रयत्न केला. काहींनी व्हीडीओ तर काहींनी सेल्फी काढून दहीहंडीचे चित्र टिपण्याचा आनंद घेतला.

सायंकाळी सुरु झालेल्या दहीहंडी सोहळ्यामध्ये पुरुष गोविंदा पथकांसाठी पाच थरांची सलामी देणाऱ्यां पाच हजार रुपये आणि सहा थरांची सलामी देणाऱ्यांना अकरा हजार रुपये असे बक्षीस होते. महिला गोविंदा पथकांसाठी चार थरांच्या सलामीसाठी पाच हजार रुपये आणि पाच थरांच्या सलामीसाठी अकरा हजार रुपये बक्षीस होते. ५० हून अधिक गोविंदा पथक या उत्सवात सहभागी झाले होते.

गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या सरावाचे प्रत्यक्ष सादरीकरण करण्याची संधी या उत्सवातून मिळाली. एकता, संयम, आणि जिद्दीच्या जोरावर अनेकांनी चार थरांपासून नऊ थरांपर्यंत सलामी देऊन बक्षीस मिळविले. पुरुष गोविंदा पथकामध्ये पाच थरांची दोन गोविंदा पथकांना सलामी दिली. या गोविंदा पथकांना प्रत्येकी पाच हजार रुपये बक्षीस देऊन गौरविण्यात आले. २६ गोविंदा पथकाने सहा थरांचे मानवी मनोरे उभारले होते. या गोविंदा पथकांना प्रत्येकी अकरा हजार रुपये प्रमाणे बक्षीस देण्यात आले. महिला गोविंदा पथकामध्ये आठ गोविंदा पथकाने चार थरांची सलामी दिली. या गोविंदा पथकांना पाच हजार प्रमाणे बक्षीस दिले. तसेच १६ गोविंदा पथकाने पाच थरांचे मानवी मनोरे लावून अकरा हजार रुपये प्रमाणे बक्षीस मिळविले. यामध्ये अलिबागमधील मेटपाडा गोविंदा पथकाने नऊ थरांची सलामी देऊन एक विक्रम केला. या दहीहंडीचा थरार बघण्याची संधी प्रत्यक्ष नागरिकांना मिळाली. संपुर्ण परिसर गजबजून गेला होता. शेकाप पुरस्कृत अलिबागमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडीचा उत्सव घरबसल्या बघण्याची संधी प्रेक्षकांनादेखील मिळाली. युट्यूबसह केबलवर थेट प्रक्षेपण बघण्याची सुविधा होती. त्यामुळे अलिबागसह वेगवेगळ्या भागातील, जिल्ह्यातील तसेच विदेशातील मंडळींनी मानाची दहीहंडीचा उत्सव घरबसल्या बघितला. दहीहंडी उत्सवामध्ये गोविंदा पथकासाठी आयोजकांनी उत्तम व्यवस्थापन केले होते. रुग्णवाहिकेसह अग्नीशमन दलाचे वाहन, वैद्यकिय यंत्रणा तैनात करण्यात आली होती.गोविंदा पथकांच्या सुरक्षेसाठी तसेच अपघात टाळण्यासाठी जमीनीवर मॅटची सुविधा उपलब्ध करण्यात आली. मध्यरात्री होत आली, तरीही हा उत्सव अधिक रंगतदार झाला होता. त्यात पावसाच्या सरी डोक्यावर कोसळत असताना त्याकडे दुर्लक्ष करीत गोविंदा पथकाने मानवी मनोरे योग्य पध्दतीने उंच उभारण्याचा प्रयत्न केला. त्याचा आनंद हजारो प्रेक्षकांनी प्रत्यक्षात अनुभवला.अखेर दहीहंडी कोण फोडणार याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले होते. अंतिम लढतीमध्ये दहा गोविंदा पथकांना चिठ्ठी सोडत पध्दतीने दहीहंडी फोडण्याची संधी मिळाली.त्यामध्ये दहीहंडी फोडण्याचा पहिला मान भोनंग- फणसापूरमधील जय हनुमान गोविंदा पथकाला मिळाला.त्यांनी योग्य पध्दतीने नियोजन करून एकावर एक मानवी मनोरे उभारले. मात्र शेवटच्या क्षणामध्ये त्यांचा डाव फसला. उंचावर असलेल्या गोविंदाचा दहीहंडी पर्यंत हात पोहचला नाही. त्यामुळे त्यांची ही संधी हूकली. दुसरी संधी पोहरादेवी गोविंदा पथकाला मिळाली. या पथकाने एक दोन थर उभारून प्रेक्षकांना सन्मान करून माघार घेतली. अखेर तिसरी संधी मेटपाडा मरीआई गोविंदा पथकाला मिळाली. हा पथक दहीहंडी फोडण्यासाठी सज्ज झाला. एकावर एक थर उभारून उंच दहीहंडीपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. अखेर मेटपाडा गोविंदा पथकाने दहीहंडी फोडून इतिहास रचला. मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. मेटपाडा गोविंदा पथकाने मानवी मनोरे उभारून अनेक विक्रम केले. आठ थरांपासून नऊ थरांपर्यंत पोहचून रायगडसह कोकणात विक्रमी कामगिरी केली. मात्र गेल्या २१ वर्षापासून दहीहंडी फोडण्याच्या प्रतिक्षेत होते. अखेर ही संधी मिळाल्यावर त्या संधीचे सोने करून दाखविले. अखेर २१ वर्षाची प्रतिक्षा संपली. ज्या क्षणाची वाट पहात होते. तो क्षण त्यांना मोठा आनंद देऊन गेला. तसेच महिला गोविंदा पथकामध्ये जय हनुमान महिला गोविंदा पथकाने दहीहंडी फोडून विजेते पद मिळविले. शहरी भागासह ग्रामीण भागातही या विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला.

---

**लोकसंसद**

### श्रीकृष्णदेवा, आम्हाला क्षमा कर! आम्ही तुझ्या सणाचे पावित्र्य संपवले!

मुंबईत दहीहंडी उत्सवात मानवी मनोरे रचताना जखमी होणाऱ्या गोविंदांची संख्या गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढत चालली आहे. २०२३ च्या दहीहंडी उत्सवात १९५ गोविंदा जखमी झाले. २०२४ मध्ये २४५, २०२५ मध्ये ३१५ आणि यंदा २०२६ मध्ये ३७६ गोविंदा जखमी झाले. मुंबईत दहीहंडी उत्सवादरम्यान एका अल्पवयीन मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. खरे तर गेल्या काही वर्षांत मुंबई, ठाण्यात ज्या पध्दतीने दहीहंडी उत्सव साजरा केला जातो ते पाहून दहीहंडीच्या सणाचे पावित्र्य केव्हाच संपले असल्याचे आणि त्याला बाजारू स्वरूप आल्याचे ठळकपणे दिसून येते. दहीहंडी उत्सवाला आता विकृत स्वरूप आले असून दुर्दैवाने या पवित्र सणाचे इव्हेंटमध्ये रूपांतर झाले आहे. 'सर्वाधिक थर आमचेच' या ईर्षे पायी थरावर थर रचले जातात. त्यामुळे उंच थरांवरून पडून गेल्या काही वर्षात अनेक तरुण मुले दहीहंडी उत्सवात कायमची अपंग झाली तर काहींना मृत्यूने कवटाळले. दुसरीकडे आपली लावणी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कलेचा अलंकार आहे. परंतु सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नावाखाली तथाकथित लावणी नृत्यांगनाकडून होणारे अश्लीलतेकडे झुकणारे उत्तान, बिभत्स आणि ओंगळवाण्या नृत्यांचे सादरीकरण यामुळे या पवित्र उत्सवाला गालबोट लागले आहे. विशेष म्हणजे यंदा दहीहंडीच्या दिवशी रस्त्यावर विना हेल्मेट आणि सायलेन्सर काढून प्रचंड आवाज करत गाड्या चालवणाऱ्या दुचाकीस्वारांमुळे अंधेरीतील नागरिकांना प्रचंड त्रास भोगावा लागला. श्रीकृष्णदेवा, आम्हाला क्षमा कर! आम्ही तुझ्या सणाचे पावित्र्य संपवले आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**| दिनविशेष**

# साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी समाज अधिक सुसंस्कृत, सुजाण आणि सक्षम बनावा, शिक्षणाच्या माध्यमातून मानवी कल्याण साधले जावे आणि प्रत्येकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात, हा साक्षरता दिनामागील प्रमुख उद्देश आहे. अज्ञानामुळे होणारी पिळवणूक, फसवणूक आणि शोषण यापासून सामान्य माणसाची मुक्तता व्हावी आणि प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव व्हावी, यासाठी साक्षरतेला विशेष महत्त्व आहे.

निरक्षरता ही केवळ अक्षरओळखीचा अभाव नसून ती व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक विकासातील मोठा अडथळा ठरू शकते. त्यामुळे जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या उद्देशाने युनेस्कोने ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जगभर या दिवसाच्या माध्यमातून साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले जाऊ लागले.

साक्षरता म्हणजे केवळ एखाद्या व्यक्तीला लिहिता-वाचता येणे नव्हे. दैनंदिन जीवनाशी संबंधित माहिती समजून घेणे, परिस्थितीचे आकलन करणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करणे, स्वतःचे निर्णय स्वतः घेणे आणि समाजाच्या प्रगतीमध्ये योगदान देणे, ही साक्षरतेची व्यापक संकल्पना आहे. आजच्या डिजिटल युगात या संकल्पनेला आणखी व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. डिजिटल माध्यमांचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करता येणे, ऑनलाइन माहितीची सत्यता तपासणे आणि आर्थिक व्यवहारांबाबत आवश्यक ज्ञान असणे, हीदेखील आधुनिक साक्षरतेची महत्त्वाची अंग आहेत.

शिक्षणाचे महत्त्व कोणाला नाही? शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे माणसामध्ये विचार करण्याची क्षमता विकसित होते. आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता निर्माण होते आणि आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव होते. त्यामुळे गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी साक्षरता हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे.

भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी देशातील साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी अनेक योजना व अभियान राबविली. १९९१ मध्ये भारताचा साक्षरता दर सुमारे ५२ टक्क्यांवर पोहोचला, तर २०११ च्या जनगणनेनुसार तो ७४.०४ टक्के झाला. म्हणजेच स्वातंत्र्यानंतर भारताने साक्षरतेच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. मात्र शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट अद्याप पूर्ण झालेले नाही.

साक्षरता वाढली की जागरूकता वाढते, जागरूकता वाढली की जबाबदार नागरिक घडतात आणि जबाबदार नागरिकांमुळे लोकशाही अधिक मजबूत होते. म्हणूनच साक्षरता ही केवळ शिक्षणाची बाब नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.

भारताला विकसित आणि सक्षम राष्ट्र बनवायचे असेल, तर देशातील प्रत्येक नागरिक साक्षर आणि जागरूक असणे आवश्यक आहे. 'शंभर टक्के साक्षर, सक्षम आणि जागरूक भारत' हे केवळ सरकारचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक ध्येय झाले पाहिजे. शासनाच्या प्रयत्नांना समाजाची साथ मिळाली, तर निरक्षरतेवर मात करून साक्षरतेचे उद्दिष्ट नक्कीच साध्य करता येईल.

जागतिक साक्षरता दिनानिमित्त प्रत्येकाने एक संकल्प करूयास्वतः साक्षर होऊया, इतरांनाही साक्षर करूया आणि ज्ञानाच्या प्रकाशाने समाजातील अज्ञानाचा अंधार दूर करूया!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

# गणेशाच्या स्वागताला खड्ड्यांचे विघ्न

## • रस्त्याला मोठ-मोठया भेगा • वाहन चालविताना तारेवरची कसरत

**| कोलाड | प्रतिनिधी |**

**मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड, खांब, वाकण, नागोठणे, येथील सर्वच ठिकाणी अंतर्गत रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले. या खड्ड्यांमुळे गणेशाच्या स्वागताला खड्ड्यांचे विघ्न यावर्षी ही दिसून येत असून गणपती बाप्पाचे आगमन खड्ड्यांतुनच होणार असल्याचे एकंदरीत परिस्थिती वरून दिसून येत आहे.**



महामार्गाच्या चौपदरीकरणाचे गेली १८ वर्षांपासून सुरु असुन अद्याप हे काम पूर्ण झाले नाही. याचा नाहक त्रास प्रवाशी वर्गाला सहन करावा लागत आहे. गणेत्सोत्व उत्सव सण कोकणात मोठया उत्साही वातावरणात साजरा केला जातो. हा सण चार ते पाच दिवसांवर येऊन ठेपला असुन या सणासाठी लाखो कोकणवाशी या महामार्गावरून प्रवास करीत असतात. परंतु या महामार्गाच्या अपूर्ण कामामुळे तसेच रस्त्याला मोठ-मोठया भेगा पडलेल्या खड्ड्यांमुळे यावर्षी कोकणवाशियांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणार आहे.

महामार्गावरील कोलाड, खांब, वाकण, नागोठणे या ठिकाणी अंतर्गत रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली असून या मार्गाला रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती झाली असुन या अंतर्गत रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या टू-व्हीलर, रिक्षा, मिनिडोअर, एसटी चालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत असुन मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तसेच मुंबई-गोवा हायवेवरील सुकेली खिंडीत दोन वर्षांपूर्वी नवीन सिमेंट काँक्रेटिकरण करण्यात आलेल्या रस्त्याला मोठ मोठे तडे गेले आहेत. यामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली असून या महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. यावरून संबंधित ठेकेदारांनी केलेला काम किती निस्कृष्ठ दर्जाचे आहे हे एकंदरीत परिस्थिती वरून दिसून येत आहे.

> **मुंबई–गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून या करिता सर्व शासकीय यंत्रणा समन्वय करून कोंडीमुक्त महामार्ग करण्याच्या सर्व उपाययोजना करण्यात योतील. तसेच महामार्गाचे काम जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण होईल**
> **–शिवेंद्रराजे भोसले**
> **सार्वजनिक बांधकाम मंत्री**

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ सप्टेंबर

१) श्रीम.सरोज वासुदेव शेडगे अलिबाग, ८-९-१९५४

२) श्रीम.सुरेखा रत्नाकर कोलते मारूती नाका, अलिबाग, ८-९-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**

## गोमा ठाकूर यांचे निधन

**चिरनेर :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मेहनतीच्या जोरावर यशस्वी जीवन प्रवास घडविणारे चिरनेर (मुळपाडा) येथील गोमा बारकू ठाकूर यांचे ८१ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, दोन कन्या, सुना, जावई, नातवंडे यासह मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. एसटी ड्रायव्हर म्हणून त्यांनी पनवेल एसटी डेपोसह, कुवेत, सिडको व जेएनपीटीच्या कामगार बसवर ड्रायव्हर म्हणून उत्तम काम केले. चिरनेर ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून तसेच गावातील विविध कार्यात लोकसेवा बजावली. त्यांचा दशक्रिया विधी रविवार (दि. १३) सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे सकाळी सात वाजता होईल. तर उत्तरकार्यविधी त्याच दिवशी रविवारी (१३) दुपारी १२ वाजता मुळपाडा येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती के बी ठाकूर यांनी दिली.

## आनंदीबाई महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

| नागोठणे | प्रतिनिधी |

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील आनंदीबाई प्रधान विद्यान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन मंगळवार (दि. ८) सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. या परिषदेसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दिनेश भगत यांनी केले आहे. सदर परिषदेसाठी बीज भाष्य करण्यासाठी मुंबई विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे शास्त्रज्ञ प्राध्यापक डॉ. विश्वनाथ आर. पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

पाच सत्रात होणाऱ्या या ई-आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये दुसऱ्या सत्रामध्ये बेंगलोर येथिल व्यवसायिक व शास्त्रज्ञ डॉ. परिषोत्तम देवांग हे उपस्थित राहणार आहेत. पाचव्या सत्रामध्ये तैवान येथील प्राध्यापक डॉ. बाबासाहेब मत्सागर हे मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेसाठी कोकण एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ पाटील, कार्यवाहक ॲड. पल्लवी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, संजय पाटील, अनिता पाटील, प्रकास पाटील, सन्माननीय नरेंद्र जैन यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या आहेत.

## तळवडे गावात गतिरोधक बसवले

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यामधील गावांमध्ये व जवळील रस्त्यांवरती वाहने खूप वेगाने धावत असतात. त्यामुळे अनेक ठिकाणी मोठमोठे एक्सीडेंटचे प्रमाण वाढले आहे. या गोष्टींना आला बसण्यासाठी व आपल्या गावातील लहान मुले वृद्ध नागरिक यांच्या सुरक्षिततेसाठी सामाजिक कार्यकर्ते रोहिदास माळी यांनी पुढाकार घेतला असून गतिरोधक बसवण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. रस्ते सुरक्षा व जनहितार्थ उपक्रम राबवण्यात आले आहे. रस्त्यांवरती गतिरोधक बसविणे या मागणीला यश आले असून पिंपळोली ग्रामपंचायतीच्या



वतीने तलवडे गावांमधील रस्त्यांवरती गतिरोधक बसवण्यात आले. याप्रसंगी सुनील घोडविंदे, अरुण विरले, परशुराम घोडविंदे, आत्माराम घोडेविंदे, नागेश कराळे, सुधीर शेळके, अनंता महादू शेळके, नरेश माळी, उल्हास घोडविंदे, प्रवीण माळी, नितीन कडव,निलेश शेळके ,राजेश माळी, साईनाथ माळी, योगेश माळी, परेश माळी, वैभव शेळके, सुशांत घोडविंदे,आकाश विरले स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘श्रावणसरी’ नृत्य स्पर्धेत खांबचा द्वितीय क्रमांक

**| कोलाड | प्रतिनिधी |**

महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘श्रावणसरी रोहा तालुका पारंपरिक नृत्य स्पर्धा २०२६’ उत्साहात पार पडली. स्पर्धेमध्ये विविध महिला मंडळांनी पारंपरिक नृत्य सादर करून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या स्पर्धेत ग्लोरीअस महिला मंडळ, खांब यांनी आपल्या सुंदर व दमदार पारंपरिक नृत्य सादरीकरणाने द्वितीय क्रमांक पटकावला.



विजेत्या संघाला रोख रुपये ७,००० चे पारितोषिक मंत्री अदिती तटकरे व प्रतिमा पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. ग्लोरीअस महिला मंडळ खांबच्या या उल्लेखनीय यशामध्ये रंजना वेदक, शोभा खांडेकर, कांचन वेदक, तृप्ती गुरव, नैना शेट, साक्षी मोहिते, समृद्धी चिंगडे, गौरी चिंगडे यांनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. तर यांना नृत्य सादरीकरणासाठी उदय तेलंगे, स्वप्निल गुरव, अलंकार खांडेकर, आदेश सानप आणि मंदार पारठे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

ग्लोरीअस महिला मंडळ खांबच्या या यशाबद्दल खांब विभागातून महिला मंडळाच्या सर्व कलाकारांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सर्वांगिनी महिला प्रभाग संघाची वार्षिक सभा

**| नागोठणे| प्रतिनिधी |**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायत राज विभाग, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आणि तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती रोहा अंतर्गत सर्वांगिनी महिला प्रभाग संघ, नागोठणे यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन मंगळवार (दि. ८) सप्टेंबर, रोजी नागोठण्यातील जैन मंदिर समोरील आराधना हॉल येथे सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजण्याच्या दरम्यान करण्यात आले आहे. सर्वांगिनी महिला प्रभाग संघाच्या या वार्षिक सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

या सभेस अनेक मान्यवर उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन करणार आहेत. या सभेस नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या महिलांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना मोलाचे मार्गदर्शन करावे असे आवाहन सर्वांगिनी महिला प्रभाग संघ, नागोठणे यांच्याकडून करण्यात आले आहे.

## कॅब चालकाकडून महिलेचा विनयभंग

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला पार्टी आटोपल्यानंतर मैत्रिणीने बुक केलेल्या कॅबने पनवेल येथील घरी जात होती. मध्यरात्री सुमारे १.३० वाजता विमानतळ सेवा रस्त्यावर कॅब चालकाने पाणी पिण्याच्या बहाण्याने वाहन थांबविले. काही वेळाने चालक पुन्हा कॅबमध्ये आला आणि मागील सीटवर बसलेल्या महिलेच्या बाजूला जाऊन बसला. त्याने महिलेचा हात पकडून तिच्याशी गैरवर्तन केले. तसेच तिचे कपडे काढण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने चालकाच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेत कॅबमधून बाहेर पडण्यात यश मिळविले. त्यानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेनंतर महिलेने कुटुंबियांशी संपर्क साधला. कुटुंबियांसह ती तक्रार दाखल करण्यासाठी पनवेल पोलिसांकडे गेली. मात्र, घटनास्थळ नवी मुंबई विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने तिला संबंधित पोलीस ठाण्यात नेण्यात आले. महिलेच्या तक्रारीवरून नवी मुंबई विमानतळ पोलिसांनी मोहम्मद अफझल शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तांत्रिक तपास सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## पतीकडून पत्नीची निर्घृण हत्या

ब्युटिकमध्ये काम करत होती. प्राथमिक तपासात असे समोर आले की, रिया आणि पतीचा किरकोळ कारणावरून वाद झाला. त्यानंतर पती घरातून रात्री आठ वाजण्याच्या सुमारास निघून गेला होता. पती गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी घरातून शेजाऱ्यांना दुर्गंधी येण्यास सुरुवात झाली. शंका आल्याने पोलिसांना याबाबत माहिती दिली गेली. पोलिसांनी घरात येऊन शोध घेतला असता भयंकर प्रकार उघडकीस आला. रियाची निर्घृण हत्या करून तिच्या शरीराचे दोन तुकडे केले होते. तसेच, रियाचे शिर धडापासून वेगळे केले होते. ते पॉलिथीनच्या बॅगेत ठेवून फ्रिजमध्ये लपवले होते. तसेच, तिची बोटेही कापण्यात आली असून, पतीने तिच्या मृतदेहाचे काही तुकडे कुत्र्याला खायला घातल्याचाही दावा केला जात आहे.

## अन्यायाविरोधात एकवटली अनुसूचित जमाती

पान १ वरून

जात प्रमाणपत्र कायदा रद्द करणे, सर्व सेवा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात यावेत, सेवा समाप्त कालावधीची गणना सेवाविषयक व सेवानिवृत्ती वेतनविषयक लाभासाठी गणण्यात येऊ नये, ही अट रद्द करणे, अनुसूचित जमातीचे तात प्रमाणपत्र विलंबाने वैध ठरविलेल्या कर्मचाऱ्यास पूर्वलक्षी प्रभावाने सेवाविषयक लाभ देणे, शासनाच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करणाऱ्या सामान्य प्रशासन विभागाचे अन्यायकारक परिपत्रक रद्द करणे, मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना कुटुंब निवृत्ती वेतन सुरू करणे, शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाल्यानंतर नियमित वेतनश्रेणीनुसार, पूर्ण वेतन लागू करावे, अशा अनेक मागण्यांसाठी निर्दशने करण्यात आली.

## ‘जीवन’दूतांचा विशेष सन्मान

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, रिलायन्स ग्रुपचे शशांक गोयल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी हेल्प फाऊंडेशन, शेलार मामा रेस्क्यू, संघर्ष एक समाज सेवेसाठी, फ्लाइंग बर्ड्स श्रीवर्धन, पोलादपूरचे सह्याद्री वन्यजीव पथक, एलअँडटी कन्स्ट्रक्शन रेस्क्यू टीम, नेरळ-माथेरान रेस्क्यू टीम, प्रतापगड रेस्क्यू, महाबळेश्वर ट्रेकर्स, महाड परिसरातील रेस्क्यू पथक तसेच जिल्ह्यातील विविध सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच, मान्यवरांच्या हस्ते रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापनास नागोठणे येथील रिलायन्स फाऊंडेशनच्या सीएसआर निधीतून बचाव नौका आणि बचाव साहित्य किट सुपूर्द करण्यात आला.

## सुडकोली रस्त्यासाठी माजी सरपंच आक्रमक

जयवंत तांबडकर यांनी व्यक्त केली आहे. गणेशोत्सव अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे. गणेशोत्सवाच्या स्वागतासह सजावटीसाठी लागणारे साहित्य, पूजेचे साहित्य खरेदी करण्याची लगबग सुरु झाली आहे. खरेदीसाठी या मार्गाने ये-जा होऊ लागली आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊनदेखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे खरेदीला जाणाऱ्या भक्तांना या खड्ड्याचा प्रचंड त्रास होत आहे. तातडीने रस्त्यांवरील खड्डे बुजविले नाही, तर या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा माजी सरपंच जयवंत तांबडकर यांनी दिला आहे.

## ई-पीक पाहणीवर ‘महसूल’चा बहिष्कार

सेवक, पोलीस पाटील, रेशनिंग दुकानदार यांच्यामार्फत पिकांची नोंद करण्याच्या सुचना दिल्या आहेत. परंतु, त्यांना या नव्या प्रक्रियेचे पुरेसे प्रशिक्षण व माहिती मिळालेली नसल्याने सुरुवातीपासूनच संभ्रमाचे वातावरण आहे.

तसेच, महसूल सेवकांच्या गेल्या अनेक वर्षांपासूनच्या शासन दरबारी विविध मागण्या प्रलंबित असल्याने महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेने सन २०२६-२७ च्या खरीप हंगामातील ई-पीक पाहणीच्या कामावर राज्यव्यापी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पीक पाहण्याची कामे ठप्प झाली आहेत. त्याचबरोबर पावसाळ्यात दुर्गम, डोंगराळ व वनक्षेत्रात प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करताना सर्प, विंचू आणि वन्यप्राण्यांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे पीक पाहणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण, आवश्यक सुरक्षा साधने आणि नोंदणी ॲपचे योग्य प्रशिक्षण देण्याची मागणी महसूल सेवकांकडून होत आहे. प्रत्येक पीक पाहणीसाठी किमान मोबदला मिळावा, अनेक दुर्गम भागांत मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने ॲपवर नोंद करताना अडचणी येण्याची शक्यता आहे. या सर्व प्रश्नांवर तोडगा निघेपर्यंत महसूल सेवकांनी ई-पीक पाहणी न करण्याची भूमिका घेतली आहे. ई-पीक पाहणीसाठी शासनाने ११ ऑगस्ट ते १० नोव्हेंबर असा कालावधी निश्चित केला असला तरी ऑगस्ट महिना संपून सप्टेंबर सुरू झाला तरी प्रत्यक्ष पीक नोंदणीला सुरुवात झालेली नसल्याने आता उर्वरित कालावधीत संपूर्ण तालुक्यातील शेतांची पीक पाहणी पूर्ण करण्याचे मोठे आव्हान महसूल यंत्रणेसमोर आहे.

## यंदा सुपारी बागांवर संकटाचे काळे ढग

असलेल्या स्थानिक अर्थव्यवस्थेचेही नुकसान होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने तातडीने चौल, रेवदंडा परिसरातील सुपारी बागांची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करावेत, अशी जोरदार मागणी बागायतदारांकडून होत आहे. तसेच, नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून पात्र बागायतदारांना शासनाकडून योग्य आर्थिक मोबदला व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. कोकणातील बागायतदारांच्या उदरनिर्वाहाचा आधार असलेल्या सुपारी पिकावर आलेले हे संकट शासन किती गांभीर्याने घेते आणि नुकसानग्रस्तांना प्रत्यक्ष मदतीचा हात कधी मिळतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ३९.४२ कोटींच्या ई-निविदेची आयोगाकडे तक्रार

आक्षेप नोंदविण्यात आला आहे. तसेच, मूळ चाचणी अहवाल, प्रतिज्ञापत्रे व पॉवर ऑफ ॲटर्नी प्रत्यक्ष कार्यालयात जमा करून त्यानंतर ऑनलाइन अपलोड करण्याची अट घालण्यात आल्याचा दावाही सावंत यांनी केला आहे.

४० कोटींच्या कामासाठी वार्षिक उलाढाल आणि अनुभवाचे निकष तुलनेने कमी ठेवण्यात आल्याचा, तसेच बँक गॅरंटीशिवाय २० टक्के म्हणजे अंदाजे ८ कोटी मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्याची तरतूद असल्याचा गंभीर आक्षेपही घेण्यात आला आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी निविदेतील वेगवेगळ्या ठिकाणी ६ महिने आणि ९ महिने असा विसंगत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सावंत यांनी, निविदा तात्काळ स्थगित अथवा रद्द करून दक्षता चौकशी करावी, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि कामांचे विकेंद्रीकरण करून फेरनिविदा काढावी, अशी मागणी केली आहे. तक्रारीच्या प्रती मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, एसीबी महाराष्ट्र आणि रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडेही पाठविण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, तक्रारीतील आरोपांबाबत रायगड जिल्हा परिषदेची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## ‘तुकडेबंदी’ हटणार

विकास प्राधिकरण व इतर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे, तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अखत्यारीतील जमिनींचा यात समावेश करण्यात आला आहे. याशिवाय महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना कायद्यानुसार अधिसूचित क्षेत्रांतील जमिनी आणि प्रारूप अथवा अंतिम प्रादेशिक योजनेत निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा अन्य अनुज्ञेय वापरासाठी निश्चित केलेल्या सर्व क्षेत्रांना या नव्या तरतुदी लागू राहतील. तसेच, ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ आणि गतिमान व्हावी, यासाठी स्थानिक महसूल यंत्रणेवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. १५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी झालेल्या अशा सर्व तुकड्यांच्या व्यवहारांची माहिती संबंधित ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांनी तातडीने संकलित करून नोंदणी विभागाकडे पाठवायची आहे. संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर महसूल अधिकाऱ्यांना फेरफार नोंदणीची पुढील सर्व प्रक्रिया ऑनलाइन प्रणालीद्वारे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

# निवडक

## साईनाथ श्रीखंडे अध्यक्षपदी निवड



**खरोशी :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्यांचे अधिक प्रभावी नियोजन व समन्वय साधण्यासाठी जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्ष पदी साईनाथ श्रीखंडे यांची निवड करण्यात आली असून रोशन चाफेकर, मयुरेश नेतकर, विशाल जोशी, चंद्रशेखर पाटील आणि धनाजी घरत यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय, विभागस्तरीय तसेच जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समित्या स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यात जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यातील रोजगार मेळाव्यांचे नियोजन, विविध आस्थापनांशी समन्वय, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून जोडण्याच्या प्रक्रियेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.



## तिर्थवणे शंकर मंदिराचा कलशारोहण

**आगरदांडा :** मुरुड तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील तिर्थवणे शंकर मंदिराचा कलश रोहण थाटामाटात उत्साहात सोहळा संपन्न झाला. नांदगावच्या उत्तरेकडील समुद्र किनारी तिर्थवणे या पवित्र स्थळी असलेल्या शंकराच्या मंदिराचा जिर्णोद्धार समिती व पंच कमिटी ग्रामस्थ नांदगावतर्फे जिर्णोद्धार करण्यात आला असून सदर मंदिरात शंकराच्या नूतन मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. तत्पूर्वी सकाळी शंकराच्या मूर्तीची बेंजोच्या तालावर वाजत गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर सरपंच सेजल घुमकर, ग्रामस्थ पंच कमिटी अध्यक्ष उमाकांत चोरघे, बबन माळी, विक्रांत कुबल, जयेंद्र चोरघे यांनी सपत्नीक होमहवन, कलश पूजन करून कलश रोहणासह गुरुजींच्या मंत्रघोषात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यानंतर महाआरती, मंदिर उभारण्यासाठी आर्थिक मदत करणार्या देणगीदारांचा सत्कार व त्यानंतर स्थानिक भजनी बुवांच्या सुस्वर भजनांचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी निरकर गुरुजी, नरेश कुबल, सुदेश घुमकर, मंगेश शेळके, नितेश रावजी,महेश कोतवाल, निरकर बाई तसेच नांदगाव व आजुबाजूच्या परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिवमंदिरात शिवभक्तांची गर्दी

**आगरदांडा :** चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाज व देवस्थान ट्रस्ट मुरूड गुरव पाखाडी येथील शिवमंदिरात श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी शिवमंदिरांमध्ये शिवभक्तांची मोठी गर्दी झाली होती. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. ‘हर हर महादेव’, ‘नमः शिवाय’च्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तीमय झाला होता. भाविकांनी भगवान शिवलिंगावर जलाभिषेक, दुग्धाभिषेक तसेच बेलपत्र, फुले व नैवेद्य अर्पण करून पूजा-अर्चा केली. शेवटचा श्रावणी सोमवार असल्याने दर्शनासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच युवकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात धार्मिक वातावरण पाहायला मिळाले होते.



## विमला तलाव बनलाय ज्येष्ठांचा ‘एनर्जी पॉइंट’

**उरण :** हातात मोबाईल, कानात इअरफोन आणि डोळे सतत स्क्रीनवर... आजच्या तरुणाईचे हे चित्र सर्वत्र दिसते. मात्र, ङ्गवय झाले म्हणून काय झाले? असे म्हणत उरणच्या विमला तलावावरील ज्येष्ठ नागरिकांनी तरुणाईलाच आरसा दाखवला आहे. शरीर थकले तरी मन थकलेले नाही, हे सिद्ध करत मॉर्निंग कट्टा विमला तलावच्या ज्येष्ठ नागरिकांनी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला. इतर सर्व सण ही याच उत्साहात साजरे केले जात आहेत. उरण शहरातील विमला तलाव परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून मॉर्निंग कट्टा विमला तलाव हा ज्येष्ठ नागरिकांच्या उत्साहाचा केंद्रबिंदू बनला आहे. दररोज सकाळी सहा ते सात वाजण्याच्या सुमारास ५० ते ८० वर्षे वयोगटातील नागरिक येथे एकत्र येतात. व्यायाम, योगासने, गप्पागोष्टी, भावगीते, वाढदिवस आणि सण-उत्सव असा या कट्ट्याचा रोजचा कार्यक्रम असतो. दहीहंडी आली की तरुणाईच नाचणार, हा समजही या ज्येष्ठांनी खोटा ठरवला! दहीहंडीच्यानिमित्ताने ज्येष्ठ नागरिकांनी नाचगाणे करत, टाळ्यांचा कडकडाट करत उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. त्यांच्या उत्साहापुढे वयाची आकडेवारीही फिकी पडली. इतर सण ही असेच साजरे करीत असतात. विशेष म्हणजे हा कट्टा केवळ गप्पांचा कट्टा नाही, तर आरोग्य आणि सामाजिक बांधिलकीचा कट्टा आहे. नियमित व्यायामाबरोबरच प्रत्येकाचा वाढदिवस उत्साहात साजरा केला जातो. विविध जाती-धर्माचे नागरिक कोणताही भेदभाव न करता येथे एकत्र येतात. सुख-दुःख वाटून घेतात आणि आयुष्याच्या उत्तरार्धातही मैत्रीचे सुंदर नाते जपतात.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# मुंद्राची झळ जेएनपीएला बसणार

## ।। पाच हजार कामगारांचा रोजगार हिरावला ।। ४० कंटेनर यार्डमधुन मालाची वाहतूक ठप्प

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गुजरात राज्यातील अदाणी यांच्या मालकीच्या मुंद्रा पोर्टमध्ये अचानक कोड सिस्टीम बंद केल्याने स्थानिक पाच हजार स्थानिक वाहतूकदार, कामगारांचा रोजगार हिरावला आहे.कोड सिस्टीम पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसाठी अदाणी यांच्या मुंद्रा पोर्ट विरोधात मागील दहा दिवसांपासून आंदोलन सुरू केले आहे. या चिघळलेल्या आंदोलनामुळे मुंद्रा बंदरातील कामकाज बंद झाले असून त्याचे जोरदार पडसाद जेएनपीए बंदर आणि उरण परिसरातील १२५ हुन अधिक असलेल्या एम्टी कंटेनर यार्डमध्ये उमटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.


(संग्रहित)

गुजरात राज्यातील अदाणी यांच्या मालकीच्या मुंद्रा पोर्टमध्ये सुरू असलेली कोड सिस्टीम अचानक बंद करण्यात आली आहे. यामुळे कोड सिस्टीम बंद करण्यात आल्याने स्थानिक वाहतूकदारांकडून ४० कंटेनर यार्डमधुन होणारी कंटेनर मालाची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. परिणामी या कंटेनर मालाची वाहतूक करणाऱ्या व्यवसायावर सुमारे पाच हजारांहून अधिक कामगार अवलंबून आहेत.त्यांच्या रोजगाराचे साधनच बंद झाल्याने त्यांनी कोड सिस्टीम पुन्हा सुरू करण्याच्या मागणीसाठी अदाणी यांच्या मुंद्रा पोर्ट विरोधात मागील दहा दिवसांपासून आंदोलनाला सुरूवात केली आहे. या आंदोलनाला कांडला मुंद्रा कंटेनर ट्रान्सपोर्ट वेल्फेअर असोसिएशननेही पाठिंबा देऊन कंटेनर वाहतूक करण्याचे काम बंद केले आहे. यामुळे मुंद्रा बंदराचे कामकाज ठप्प झाले आहे.

दरम्यान, उरण, जेएनपीए परिसरातही १२५ हुन अधिक असलेल्या एम्टी कंटेनर यार्ड कार्यरत आहेत. या एम्टी कंटेनर यार्डमधुन दररोज सुमारे २१,३०० आणि दरमहा जवळपास ६.४ लाख (टीईयुएस) एम्टी कंटेनर हाताळणी केली जाते. या उद्योगातून थेट व अप्रत्यक्षपणे १२ हजारांहून अधिक कामगारांना रोजगार मिळतो. यामध्ये स्थानिक युवक, कामगार, सर्व्हेअर्स, तंत्रज्ञ, यंत्रचालक, सुरक्षा कर्मचारी, डेपोशी संलग्न वाहतूकदार आणि विविध सेवा पुरवठादार जमीनमालक, डेपो मालक, प्रकल्पग्रस्त कुटुंबे, विक्रेते आणि पूरक उद्योग यांचा समावेश आहे.

### आयात- निर्यात व्यापारात व्यत्यय

मुंद्रा बंदरातील चिघळलेले आंदोलन आणि आयात- निर्यात व्यापारात आलेल्या व्यत्ययानंतर सीएमए, सीजीएम, ओएनई, एमएस्सी, ईव्हरग्रीन, हॅपागलॉईड यांच्यासह इतर विविध शिपिंग लाईन्स आणि एनव्हीओसीसी ऑपरेटर्सकडून खबरदारीच्या सुचनाही जारी करण्यात आल्या असल्याचेही सांगण्यात येत आहे.

तुर्तास मुंद्रा बंदराप्रमाणे जेएनपीए व उरण परिसरातील कंटेनर वाहतूकदारांसाठी कोणतीही कोड सिस्टीम लागू करण्यात आलेली नसली तरी भविष्यात जेएनपीएचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसलेल्या पाचही खासगी बंदरांकडून कोड सिस्टीम लागू केव्हाही लागू केली जाऊ शकते. त्यामुळे अदाणी यांच्या मुंद्रा बंदराप्रमाणेच जेएनपीए, उरण परिसरातील कंटेनर यार्डमध्ये अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. यामुळे एम्टी यार्डवर आधारित असलेल्या १२ हजारांहून अधिक कामगार, व्यावसायिकांवर उपासमारीचे संकट उभे ठाकण्याची भीती कंटेनर यार्ड मालकांकडून व्यक्त केली जात आहे.

## पत्रकार सलीम शेख यांना मातृशोक

**। माणगांव । प्रतिनिधी ।**

माणगांव येथील ज्येष्ठ पत्रकार सलीम शेख यांच्या मातोश्री आमिना मुबारक शेख यांचे रविवारी (दि. ६) सप्टेंबर रोजी राहत्या घरी जुने माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, जावई, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शेख व सय्यद कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.



आमिना शेख या शांत, संयमी व मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांना वर्तमानपत्रे वाचण्याचा आणि बातम्या ऐकण्याचा छंद होता. तासंतास त्या वर्तमानपत्रे वाचत असत. गावातील कोणताही व्यक्ती दिसल्यास त्यांची विचारपूस करावी हा त्यांचा स्वभावगुण होता. गेल्या काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. वाढत्या वयामुळे शरीरावर औषधांचा प्रभाव पडत नव्हता. रविवारी सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आमिना शेख यांच्या निधनाची माहिती सर्वत्र समजताच अनेकांनी त्यांच्या राहत्या घरी जुने माणगाव येथे येऊन त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. आमिना शेख यांचा रात्री ८ वा. जुने माणगाव येथील कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला. त्यावेळी दफनविधीला मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## वरसोलीत शिक्षकांना आर्थिक नियोजनाचे धडे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून आगरी समाज संस्था, अलिबागतर्फे आयएसआय शाळा, वरसोली येथे शिक्षकांसाठी माझा पैसा माझी जबाबदारी- अर्थात आर्थिक नियोजन या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या वतीने अध्यक्ष निलेश पाटील, शुभांगी म्हात्रे यांनी शिक्षकांना आर्थिक नियोजन, बचत, गुंतवणूक आणि आर्थिक शिस्त याबाबत मार्गदर्शन केले. आगरी समाज संस्थेच्या करिअर व शैक्षणिक मार्गदर्शन अभियानाची सुरुवात आयएसआय शाळा, वरसोली येथूनच झाली होती. संस्थेच्या विविध उपक्रमांनी प्रभावित होऊन शाळेचे मुख्याध्यापक किरण पाटील यांनी शिक्षक



दिनानिमित्त शिक्षकांसाठी उपयुक्त कार्यक्रम आयोजित करण्याबाबत संस्थेशी संपर्क साधला. त्यानुसार आर्थिक नियोजन ह्या प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आणि भविष्यासाठी महत्त्वाचा विषय असल्याने त्यावर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी आर्थिक नियोजनाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात आले. उत्पन्नाचे नियोजन, बचत, गुंतवणूक, आर्थिक शिस्त आणि भविष्यातील आर्थिक गरजांसाठी नियोजन यांसारख्या विषयांवर उपस्थित शिक्षकांशी संवाद साधण्यात आला. कार्यक्रमासाठी आगरी समाज संस्थेचे उपाध्यक्ष सुनील तांबडकर, प्रभाकर ठाकूर, दिपश्री पाटील यांची उपस्थिती होती. आर्थिक नियोजनासारख्या महत्त्वपूर्ण आणि दैनंदिन जीवनाशी निगडित विषयावर शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी आगरी समाज संस्थेने पुढाकार घेतल्याबद्दल मुख्याध्यापक किरण पाटील यांनी संस्थेचे आभार मानले.

तसेच आगरी समाज संस्था राबवत असलेल्या विविध अभिनव सामाजिक, शैक्षणिक आणि समाजोपयोगी उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. कार्यक्रमाला शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिक्षकांनी विविध प्रश्न विचारून आर्थिक नियोजनाबाबत अधिक माहिती जाणून घेतली. आर्थिक नियोजन, गुंतवणूक आणि बचतीबाबत आवश्यकतेनुसार पुढील काळातही मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येईल, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## लाडवली-मांडला रोडचे खड्डे बुजवण्यास सुरुवात

**। महाड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील लाडवली-मांडला मार्गावरील जीवघेण्या खड्ड्यांचा प्रश्न अखेर मार्गी लागण्यास सुरुवात झाली आहे. रस्त्याची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे वाहनचालकांना सहन करावा लागत असलेला त्रास लक्षात घेऊन शिवशंभो मित्र मंडळाने सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना अखेर यश आले असून संबंधित यंत्रणेकडून रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.


कृषीवल इफेक्ट

लाडवली-मांडला मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत होती. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढला होता. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर वाहनांची वर्दळ वाढणार असल्याने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती.

या समस्येकडे 'कृषीवल' वृत्तपत्रानेही वारंवार लक्ष वेधत बातम्यांच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. रस्त्याची दुरवस्था, खड्ड्यांमुळे नागरिकांना होणारा त्रास आणि तातडीने दुरुस्तीची गरज याबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांचा परिणाम अखेर दिसून आला आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

मात्र, केवळ खड्डे बुजवून काम थांबवू नये, अशी मागणी आता पुढे येत आहे. रस्त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने डांबरीकरण करून कायमस्वरूपी मजबुतीकरण करावे, तसेच निकृष्ट काम पुन्हा होणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

शिवशंभो मित्र मंडळाचा पाठपुरावा आणि 'कृषीवल' वृत्तपत्राच्या सातत्यपूर्ण वार्तांकनामुळे प्रशासनाला अखेर जाग आली असून, हा जनहिताच्या लढ्याचा विजय असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## भैरवनाथ महिला मंडळाचा प्रथम क्रमांक

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरातील गो.म.वेदक हायस्कूल तळा येथे राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुका व शहराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य श्रावणसरी नृत्य स्पर्धेत भैरवनाथ महिला मंडळाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. पवित्र श्रावण महिन्यात महिलांतील सुप्त कला गुणांना वाव मिळावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी तळा तालुका व तळा शहर यांच्या वतीने या भव्य श्रावणसरी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या नृत्य स्पर्धेत एकूण १४ महिला पथकांनी सहभाग घेतला होता. त्यातील दहा हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक भैरवनाथ महिला मंडळ,द्वितीय सात हजार रुपयांचे पारितोषिक दर्या सागर वाशी हवेली तर तृतीय पाच हजार रुपयांचे पारितोषिक रोहिदास महिला मंडळ यांनी पटकावले. उत्तेजनार्थ असलेले पारितोषिक कालकाई महिला मंडळ वाशी हवेली व एकविरा महिला मंडळ कासार आळी यांनी पटकावले. या कार्यक्रमास मंत्री आदिती तटकरे, जान्हवी शिंदे, गीता जाधव, नलिनी लोखंडे, माधुरी घोलप, मेघा सुतार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रावण मास ग्रंथ वाचन

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील भडवल गावातील वारकरी संप्रदायमधील ग्रामस्थांनी श्रावण महिन्यात येथील गावदेवी माता मंदिरात सामूहिकपणे ग्रंथ वाचन केले. भडवल गावातील ग्रामस्थ एकत्र येत श्रावण महिन्यात ग्रंथ वाचन करण्याचा निर्णय घेतला. दररोज रात्री ८ ते ११ या वेळेत हरिविजय या ग्रंथाचे वाचन करण्यात आले. गावातील गावदेवी मंदिरात ३० हून अधिक ग्रामस्थ दररोज एकत्र येऊन हरिविजय ग्रंथाचे श्रवण करीत होते.

## ज्योती पाटील यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**। पेण । प्रतिनिधी ।**

ज्ञानदानाला सेवाभावाची जोड देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अविरत कार्य करणाऱ्या, विद्यार्थ्यांच्या मनात आपुलकीचे स्थान निर्माण केलेल्या पेण तालुक्यातील विद्यार्थीप्रिय ज्योती पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा मानाचा गौरव करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने प्रदान करण्यात येणारा गुणवंत शिक्षक पुरस्कार-२०२६ त्यांना प्रदान करण्यात आला.




महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या माध्यमातून आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा कळंबोली सेक्टर-१ येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानासोबतच गणित व विज्ञान विषय विद्यार्थ्यांना सहज, आनंददायी आणि कृतीशील पद्धतीने समजावून सांगण्याच्या त्यांच्या प्रभावी कार्याची या पुरस्कारासाठी विशेष दखल घेण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला पैलू पाडतानाच त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील राहिल्या आहेत. यांच्या या कर्तृत्वामागे पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तसेच संस्थाचालकांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्य यांचाही मोलाचा वाटा असल्याचे मानले जात आहे.


या सन्मानाबद्दल पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, संस्थाचालक, सौ. म. ना. नेने कन्या विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच मित्रपरिवार, नातेवाईक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## हिरव्यागार शेताचे माळरानात रुपांतर | संपूर्ण तालुक्यात दहशतीचे वातावरण

# रिकाम्या गावांत माकडांच्या टोळ्या

**। कापोली । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून गौरवले गेले, त्याच मातीत आज शांतता पसरली आहे. ही शांतता समाधानाची नाही, तर एका हताश आणि उद्विग्न शेतकऱ्याच्या आसवांची आहे. माकडे आणि रानडुकरांच्या अतोनात नुकसानीमुळे श्रीवर्धन तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी शेती करणे पूर्णपणे सोडून दिले आहे. गावच्या गावे आज शेतीपासून दुरावली असून, हिरवीगार शेते आता ओसाड माळरान बनू लागली आहेत. तालुक्यातील परिस्थिती इतकी भीषण झाली आहे की, गावांमध्ये



माणसांची संख्या झपाट्याने घटली असून, रिकाम्या झालेल्या या गावांवर आता माकडांच्या टोळ्या आणि मोकाट जनावरांनी पूर्णपणे ताबा मिळवला आहे.

माकडे आता महिला आणि लहान मुलांच्या अंगावर थेट हल्ले करीत आहेत. पुरुष मंडळी कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर, घरात एकट्या असणाऱ्या महिला, वृद्ध आणि निष्पाप लहान मुलांच्या अंगावर माकडांच्या टोळ्या थेट धावून जात आहेत. अनेक गावांमध्ये माकडांनी केलेल्या हल्ल्यात महिला आणि मुले जखमी झाल्याच्या घटना घडल्या असून, संपूर्ण तालुक्यात कमालीचे भीतीचे आणि दहशतीचे वातावरण आहे.

शेती पूर्णपणे उध्वस्त झाल्यामुळे आणि घरात राहणेही असुरक्षित झाल्याने, श्रीवर्धनमधील शेकडो कुटुंबांनी तरुणांनी मुंबई-पुण्यासारख्या शहरांमधील मजूरीसाठी सक्तीचे स्थलांतर केले आहे. शेती तर आधीच या रानडुकरं आणि माकडांमुळे उजाड झाली, आता यांनी आमची घरदारंही सोडली नाहीत. संपूर्ण तालुक्यात माणसं कमी आणि हिंस्र माकडं-जनावरं जास्त झाली आहेत. आम्ही आमच्याच गावात उपरे झालोय. शासनाने याचा कायमचा बंदोबस्त करावा, नाहीतर आम्हाला गाव सोडून जाण्याशिवाय पर्याय नाही, अशी उद्विग्न आणि संतप्त प्रतिक्रिया स्थानिक ग्रामस्थांनी दिली आहे.

या परिस्थितीवर शेतकरी संघटनेने अत्यंत संताप व्यक्त केला असून मवाळ भूमिका सोडून थेट आरपारच्या लढाईची हाक दिली आहे. शासनाने माकडे आणि रानडुकरांचा कायमचा बंदोबस्त केला नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाई असा थेट इशारा तालुक्यातील नागरिकांनी व शेतकरी संघटनेने दिला आहे.

### कौले-पत्रे उचकटून घरात प्रवेश

माकडांचा सुळसुळाट आता केवळ शेतापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर या टोळ्यांनी आता थेट ग्रामीण भागातील घराघरांवर ताबा मिळवला आहे. घरावरील कौले आणि पत्रे उचकटून आत घुसणे आणि घरात ठेवलेले अन्नधान्य पळवून नेणे अशा प्रकारचा अंगावर काटा आणणारा हैदोस माकडांनी मांडला आहे.

निवडक



## आगरी समाजातर्फे स्वच्छता मोहीम

**अलिबाग** : कनकेश्वर परिसर स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने आगरी समाज संस्था, अलिबागतर्फे रविवारी (दि. ६ ) सप्टेंबर रोजी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. संस्थेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, रॅपर व अन्य कचरा संकलित केला. या मोहिमेत सुमारे २० बॅग प्लास्टिक कचरा जमा करण्यात आला. कनकेश्वर येथे येणाऱ्या भाविक व पर्यटकांनी प्लास्टिकच्या बाटल्या आणि खाद्यपदार्थांचे रॅपर परिसरात न टाकता ते सोबत परत आणावेत, यासाठी ठिकठिकाणी जनजागृतीपर पोस्टर्स लावण्यात आले. कचरा संकलनाबरोबरच नागरिकांच्या व पर्यटकांच्या सवयींमध्ये बदल घडविण्याचा प्रयत्न या मोहिमेतून करण्यात आला. संकलित केलेल्या कचरा पायथ्याशी आणण्यात आला. संकलित प्लास्टिक पुनर्वापरासाठी पाठविण्यात आला. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबरोबरच पुनर्वापराला प्रोत्साहन देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. या मोहिमेत निलेश पाटील, प्रभाकर ठाकूर, उदय म्हात्रे, राजेंद्र पाटील, शशिकांत मिठाग्री, अंकुश पाटील, बिपीन टेमकर, वैभव पाटील, वैभव शेळके, रुपेश पाटील, अर्णव पाटील, सई पाटील, दिपश्री पाटील, दर्शना पाटील यांनी सहभाग घेतला होता.

## रामकृष्ण भोईर यांना पुरस्कार

**पेण :** रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत जिल्ह्यातील १५ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, यामध्ये पेण तालुक्यातील राजिप शाळा मायणी-कोयना येथील शिक्षक रामकृष्ण भोईर यांचा समावेश आहे. रामकृष्ण भोईर यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विविध नाविन्यपूर्ण



उपक्रम राबवत मायणी-कोयना शाळेला तालुकास्तरीय आदर्श शाळेचा पुरस्कार मिळवून दिला आहे. तसेच शाळेने जिल्हास्तरीय उपक्रमांमध्येही सहभाग नोंदवला आहे. उपक्रमातून शिक्षण या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे शाळेतील विद्यार्थी विविध क्षेत्रांत विशेष गुणवत्ता संपादन करत आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्याची व नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेत रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने त्यांना यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाट्यगृहात होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.



## मुनवलीत शिक्षकांचा सन्मान

**सोगाव :** शिक्षक दिनानिमित्त अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी व घाडी बंधू यांच्या वतीने मुनवली येथील हनुमान मंदिरात शनिवारी (दि. ५) सप्टेंबर रोजी मुनवली व सोगाव येथील विविध शाळेत शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी रिजवाना मुल्ला, सुरय्या सय्यद, सॉलिहा चौधरी, नेहा कांबळे(घोडपकर), अदिती हरवडे, कृतिका कदम, अक्षता कदम, असिफा कुर, शैलेश तिर्लोटकर, अजित हरवडे, अनिल नाईक यांच्यासह इतर शिक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश वडे यांनी सचिन घाडी व घाडी बंधूंचे विशेष कौतुक केले. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश वडे, ज्येष्ठ नागरिक दिलीप मोंढे, आत्माराम पंडम, अरविंद मसुरकर, अशोक मसुरकर, मधुकर सूद, गंगाराम ठकरूळ, वामन ठकरूळ, सुरेश हाके, सतीश घाडी, सचिन घाडी, मापगाव ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या सानिका घाडी, संतोष बांद्रे, महेंद्र कदम, प्रविण घाडी, संदेश करमेळे, मुनावर कुर, अमोल मोंढे, निकेश अनमाने, नितेश ठकरूळ, मयूर अनमाने, प्रतीक अनमाने, सुयोग अनमाने, जयेश हाके, वेदिका मोंढे, संगीता म्हात्रे, प्रणिता अनमाने, सुलभा अनमाने, वंदना अनमाने, अहिल्या अनमाने, निर्मला पंडम, सुलोचना मोंढे, मनीषा अनमाने, संगीता अनमाने, अस्मिता अनमाने, नमिता अनमाने, संजना अनमाने, वंदना नागावकर, रीना मोंढे, सानिया घाडी यांच्यासह मुनवली पंचक्रोशीतील विद्यार्थी व महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जागा भाड्याने देणे आहे. १२०० स्क्वेअर फुट दूकानाचे तीन गाळे भाड्याने देणे आहे. ७०३८६५६४४६
- नागाव येथे रोडटच ६ गुंठे जागा विकणे आहे. तार कंपाऊंड मारले आहे. संपर्क- ७०३८६५६४४६
- नागाव येथे रिसॉर्ट मध्ये अकाउंटन्ट या पोस्ट साठी काम ला मुलगी पाहिजे आहे. कमीत कमी १ वर्षाचा टॅली (Tally) हाताळल्याचा चा अनुभव पाहिजे. इच्छुकांनी खाली दिलेल्या नंबर वरती कॉन्टॅक्ट करावा आणि आपला रिस्युम पाठवावा. मोबाईल नंबर. +९१९८१९०९३३२०
- ऑफिस कामाकरीता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर, ऑफिस असिस्टंट रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण- ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT संपर्क- विधान्त इंफ्रा + ९१७२१९२९१२३१ पत्ता- अलिबाग वेळ- ११.०० ते ५.००

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६ २६४२११

जा.क्र.केएमसी/बांधकाम/२४७३ दिनांक :- ०७/०२/२०२६

**खोपोली नगरपरिषद**

**जाहीर सुचना २०२६-२७**

खोपोली नगरपरिषद, ता. खालापुर, जि. रायगड यांजकडून खालील कामांसाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदार/कंत्राटदार यांजकडुन दिनांक १८/०९/२०२६, सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सिलबंद दरपत्रके मागवित आहे. या दरांवर नियमानुसार होणारी जी.एस.टी व विम्याची रक्कम नगरपरिषदेमार्फत अदा करण्यात येईल.

| अ.क्र | बाब | परिमाण |
|---|---|---|
| १ | सिध्दार्थनगर येथे उत्थीत शिल्प तयार करणे.<br>१. मटेरियल व फिटींग करणे. फायबर मटेरियल, साईज ९X६ = ५४ चौ. फुट | १ नग |
| २ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील पोलीस स्टेशन लगत असलेली कमान दुरुस्त करणे.<br>१. कमानीचे जुने स्ट्रक्चर रिपेअर करणे.<br>२. लोखंडी स्ट्रक्चर रेडऑक्साईड करुन पेंन्ट करणे.<br>३. पत्रा काढून नवीन फायबर कोट पत्रा बसविणे.<br>४. अशोकचक्र दुरुस्ती करुन बसविणे.<br>५. दगडी फायबर स्ट्रक्चर काढुन नविन बसविणे.<br>६. सर्व स्ट्रक्चरला ऑटोपेंट करणे.<br>(सर्व काम, रंगकाम खर्च लेबर क्रेनसोबत करणे.) | ६ नग |
| ३ | खोपोली नगरपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विविध स्मारकांचे म्युरल दुरुस्त व रंगकाम करणे.<br>१. म्युरलचे जुने स्ट्रक्चर रिपेअर करणे.<br>२. सर्व म्युरलचे स्ट्रक्चरला ऑटोपेंट करणे. | २ नग |

सही/-
**नगर अभियंता**
खोपोली नगरपरिषद

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती मिनल कृष्णकांत पाटील वगैरे सर्व रा. सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| सुरई ता. अलिबाग | ३२२ | ०-२३-००<br>पो. ख ०-०२-००<br>०-२५-०० | ०.३६ |
| सुरई ता. अलिबाग | २५३ | ०-४३-००<br>पो. ख ०-०२-००<br>०-४५-०० | ०.८२ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल; हे सर्वांस कळावे.

अलिबाग, सही/-
दि. ०७-०९-२०२६.
**अॅड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल खुशराव इरानी यांनी नमुद केलेली गावठाण मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री.महादेव गुलाबराव पाटील व श्री.राजेंद्र प्रभाकर घरत यांचेसोबत झालेली आहे. सदरची गावठाण मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र व उपविभाग | नविन गावठाण प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| परहुर | १३२/१ | ३४ | ३३ X ६६<br>२१७८ चौ फुट,<br>अंदाजे सुमार<br>०-०२-०० गुंठे |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहीवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**अॅड. स्वरुपा स्वप्नील गायकवाड**
मोबा नं. ८९९९८८९०३९
Rest : Shop No. 2.0PP SBI Bank
At-post zirad, Tal-Alibag -Raigad

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसोद्वारे कळविण्यांस येते की मौजे धोंडपाडा, ता.पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल शांताराम किसन घुले यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.सुरेश वासुदेव भोईर यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| धोंडपाडा | १२३/२/अ | ०.३३.३०<br>पो.ख.०.१४.२०<br>एकुण क्षेत्र ०.४७.५० | ०.६२ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी ०.२५.०० हे.आर. इतके क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण
दि :- ०७/०९/२०२६
**अॅड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलिस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं ९८२२०३०३८९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे सुरई, ता. मुरुड, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक ८० क्षेत्र ०-४८-०० (हे आर.), आकार १३ रु.८१ पैसे ही भातशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान कबजेदार आब्बास इस्माईल दळवी यांचे मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदरची मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांजकडुन आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी मिळकतीचे विद्यमान कबजेदार व आमचे अशिल यांच्यात झालेली आहेत. सदर मिळकतीची मालकी व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार आब्बास इस्माईल दळवी यांचाच आहे, असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन एकविस दिवसांचे आत खालील सही करणार ''खरेदीदारा तर्फे अॅडव्होकेट'' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
ता. ०७/०९/२०२६
**अॅड. श्रध्दा प्रदीप वैद्य**
''नागेश्वर भुवन'' गणपती आळी, मु.पो.नागांव,
ता. अलिबाग, जिल्हा रायगड.
(खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट)

**वसुली अधिकारी यांचे कार्यालय**
**केएनएस बँक (दी कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.) शी संलग्न**
३१२, कमर्शियल ए विंग, कोहिनूर सिटी मॉल, किरोल लोड, ऑफ एलबीएस मार्ग, कुर्ला (प), मुंबई -४०००७०.
०२२-६७२९ ४३०० मोबा. : ८१०८९७५२४४/८६००९९६०६०
ई-मेल : babasaheb.tambe@kns.bank.in, vijaykumar.shimpi@kns.bank.in

**फॉर्म झेड**
**(नियम १०७ च्या उप-नियम ११ (डी-१) पहा)**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची सूचना**

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये केएनएस बँक (दी कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.) चे वसुली अधिकारी म्हणून, मी निम्नस्वाक्षरीकर्ता न्यायनिर्णित ऋणको १) श्री. साळुंखे वीरेंद्र गंगाराम २) श्री.जाधव तुकाराम रामचंद्र ३) श्री.जलकोटे माधवराव नामदेव यांना दिनांक २९.११.२०१० रोजी मागणी सूचना आणि दिनांक १०.०६.२०२६ रोजी नवीन मागणी सूचना बजावून, १०.०६.२०२६ च्या नवीन मागणी सूचनेनुसार रु. ११,४७,४६०.०० (अक्षरी रुपये अकरा लाख सत्तेचाळीस हजार चारशे साठ फक्त) ही रक्कम परत करण्यास सांगितले होते; परंतु न्यायनिर्णय-ऋणको यांनी संपूर्ण रक्कम परत करण्यात कसूर केली आहे.

निर्णय-ऋणको यांनी रक्कम परत करण्यात कसूर केल्यामुळे, निर्णय-ऋणको आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम १०७ ११(डी -१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, मी खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा आज दिनांक ०४ सप्टेंबर, २०२६ रोजी घेतला आहे.

न्यायनिर्णय-ऋणको आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये; आणि या मालमत्तेबाबत केले जाणारे कोणतेही व्यवहार हे दी कुर्ला नागरिक सहकारी बँक लि. च्या प्रभारांतर्गत रक्कम रु. ११,५७,५३२.०० (अक्षरी रुपये अकरा लाख सत्तावन्न हजार पाचशे बत्तीस फक्त) इतक्या रकमेच्या (दिनांक ३१.०८.२०२६ रोजीची स्थिती) आणि त्यावर होणारे व्याज, खर्च आदी भाराच्या अधीन राहतील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड - फ्लॅट क्र. सी-१३, सी-५, पहिला मजला, कैसर कॉम्प्लेक्स, बिरवाडी, तालुका महाड, जिल्हा रायगड - ४०२ ३०१.

सही/-
दिनांक :०४.०९.२०२६ **(श्री.बाबासाहेब आर.तांबे)**
ठिकाण : बिरवाडी, महाड **वसुली अधिकारी,**
**एम.सी.एस. कायदा, १९६० तसेच नियम १०७ अंतर्गत नियम १९६१ अंतर्गत**
**केएनएस बँक (दी कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.), मुंबई**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-रजपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री.जिवनदास पांडुरंग घुडे व इतर ८ | २६/१/क | ०.०६.०० | ०.०२ |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक-श्री. जिवनदास पांडुरंग घुडे व इतर यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे,

कर्जत सही/-
दिनांक : ०८/०९/२०२६
**अॅडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्, मुद्रे (बुद्रुक),
ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक दिपावली शैलेश सकपाल यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे अरवंद, ता . कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै .) |
|---|---|---|---|
| १४ | ९ | ०-११-०० | ०-१० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ (तीन) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०९/२०२६
खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) कल्पना अभिजीत भगत रा. विद्यानगर अलिबाग २) सारिका निखील चव्हाण रा. गोविंद नगर, बायपास रोड, चेंढरे, ता.अलिबाग जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत साठेकरार लिहून दिलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा ता.अलिबाग | ३३/ब | २.८०.०० | २८.०० |

सदर वर नमूद केलेली बिनशेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकती बाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्यावे. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग सही /-
तारीख : ०७/०९/२०२६
**अॅड. शैलेश प्रभाकर पाटील**
शॉप नं.४, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांचे द्वारे पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलद्वारे ई-निविदा प्रक्रियेतून खुली निविदा एकल पाकिट बोली प्रणाली आमंत्रित करण्यात येत आहे : **कामाचे नाव**: महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील कणकवली आणि कुडाळ स्थानकांवरील प्लॅटफॉर्म क्र. 1 व 2 वर (लिफ्ट) सिव्हिल व्हर्टिकल शाफ्ट स्ट्रक्चरची तरतूद. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-लिफ्ट-22-2026 दिनांक: 07.09.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु. 1,39,85,739.05 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 14.09.2026. **बंद होण्याची तारीख/वेळ**: ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी 28.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्णत्वाचा कालावधी**: 6 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** वेबसाइट पहावी आणि शुद्धिपत्र / परिशिष्ट केवळ याच वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक सौ. इंदिराबाई गोविंद पाटील, श्री. गोपाळ भाऊ पाटील, श्री. प्रमोद गोविंद पाटील, सौ. संगिता राजेंद्र पाटील, सौ. ज्योती अशोक भोपी, सौ. मिनाक्षी शशिकांत म्हात्रे, सौ. सुनिता रमेश शेलार, श्री. किरण एकनाथ पाटील, श्री. धनंजय एकनाथ पाटील, सौ. वंदना एकनाथ पाटील, श्री. विलास एकनाथ पाटील, श्री. अरविंद श्रीराम पाटील, श्री. दिनानाथ श्रीराम पाटील, श्री. मधुकर श्रीराम पाटील, श्री. वासुदेव श्रीराम पाटील, श्री. सुर्यकांत श्रीराम पाटील, सौ. कोमल सुनिल पाटील, सौ. वैशाली सुनिल पाटील, सौ. सेजल सुनिल पाटील, सौ. स्नेहल सुनिल पाटील, श्री. नितीन तुलशीदास पाटील, श्री. राजेंद्र तुलसीदास पाटील, श्री. सचिन तुलशीदास पाटील, सौ. प्रचिता प्रदीप मोकल, श्री. नंदकुमार यशवंत पाटील, श्री. प्रकाश यशवंत पाटील, सौ. लक्ष्मी गोंविद राणे, सौ. निर्मला भागवत डायरे, सौ. सुनिता हनुमान तरे, सौ. सोनाली मोरेश्वर तरे, सौ. अश्विनी विजय बदे, श्री. कुणाल विजय बदे, श्री. भगवान तुकाराम बदे, श्री. वृषाल विजय बदे, सौ. अर्चना अशोक मेंगळ, सौ. तेजस्विनी अनिल म्हात्रे, सौ. योगिता चंद्रकांत राउत, सौ. शालीनी खंडू पाटील यांनी व त्यांचे वारसांनी त्यांचे वडीलोपार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील शेतजमिन मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे पोशिर, तालुका- कर्जत, जिल्हा - रायगड ४१०१०१ येथील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ ( हे.आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|
| ९७/९ | ०.४५.००<br>०.२२.०० पो. ख<br>०.६७.०० एकूण या क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे अविभक्त हिस्स्याचे असलेले मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र | ०.२८ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबाकब्जा बयाणा पावती साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, करारनामा, खरेदीखत, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या तक्रार/हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख ०७/०९/२०२६ सही /
**अॅड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, धामोते, नेरळ कळंब
रोड, ता.कर्जत जि.रायगड. ४१०१०१.
मो.नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि माझ्या अशिलांनी मौजे ताडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्री. सागर किसन पाटील, रा. बामणसुरे, पो. किहीम, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे - ताडवागळे, ता.अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १११, क्षेत्र ०-२६-१० हे. आर + पो.ख. ०-०२-४० हे. आर, एकूण क्षेत्र ०-२८-५० हे. आर, आकार रु. ६.९२ पैसे. व त्यावरील ग्रामपंचायत ताडवागळे मालमत्ता क्रमांक ३९४, क्षेत्र २३ चौ.मी.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलंवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग सही /-
दिनांक : ०८/०९/२०२६
**अॅड. ऋग्वेद अविनाश ठाकूर**
रा. ५/३, आत्माराम नगर,
अलिबाग-रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

## जाहीर नोटीस

आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरून व दाखवलेल्या कागदपत्रांवरून तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि विद्यमान मालक बाळकृष्ण चांगु पाटील व रोहित बाळकृष्ण पाटील सर्व रा.उरण, रायगड, यांच्या खुद्द मालकीची जमीन मिळकत असून सदर मिळकत हि खरेदी-विक्रीबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान बोलणी सुरु असून ते पुढील काही दिवसांमध्ये सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील.

**परिशिष्ठ**
**मिळकतीचे वर्णन : जिल्हा व तुकडी रायगड, तालुका व पोटतुकडी उरण येथील तलाठी सजा पुनाडे हद्दीतील**

| गाव | गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| जुई पुनाडे | ५ | १/अ/१ | ०-०५-४०<br>०-०७-१०<br>०-१२-५० | ०.४९ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र हे या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वर परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत हि निर्वेध, निर्जोखमी असून ती कोणत्याही जड जोखमात गुंतवली नसल्याची खात्री हि विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. त्याबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, खरेदीखत, साठेकरार, गहाणखत, दान, लीज, लीन, बक्षीस, ताबा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा करार, हितसंबंध, अधिकार, बोजा, असल्यास व/वा त्याबाबत कोणीही विद्यमान मालकांचे सोबत कोणताही दस्त केला असल्यास, ज्यामुळे वर परिशिष्टात नमूद मिळकतीच्या व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या मुदतीत मूळ कागदपत्रांसह खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावी, अन्यथा वर नमूद मिळकतीचे व्यवहाराबाबत कोणाचीही कसलीही हरकत नाही व असल्यास त्यांनी सदर जमिनीमधील त्यांचे हक्क व अधिकार जाणीव पूर्वक सोडून दिले असे समजून आमचे अशील वर नमूद मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यापश्चात कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०९/२०२६
**अॅड.सुरज ज.पाटील.**
प्लॉट नं.२, राजहंस बंगला, लोकमान्य हौसिंग
सोसायटी, पेण, ता. पेण, जि. रायगड
मो. क्र. ९७६३२९१६४९

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील लिहून देणार मिळकतीचे मालक यांची खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने आमचे अशिल श्री निखिल दत्तात्रेय मते यांना विकत देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे माले, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं | क्षेत्र हे आर चौ.मी. | आकार |
|---|---|---|
| ४/१८/अ/१ | ०.८१.०० | ०.४५ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक ७/९/२०२६
**वकील किशोर अनंता दिघे**
पत्ता-मुखाड्याचापाडा, पो.पाषाणे
ता.कर्जत, जि.रायगड
मो नं ८००७९७०१५१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आक्षी ता.अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक कल्पना प्रकाश ठाकर यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी ता.अलिबाग जि.रायगड | २५७ | ०-३२-९०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकुण क्षेत्र ०-३४-७० | ९.३७ |

वर नमुद मिळकतीपैकी श्रीमती. कल्पना प्रकाश ठाकर यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जावहिवाटीतील ०-०५-५० हे.आर. आकार रू.१.४८ पैसे भातशेती व बागायत मिळकतीचे.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ०८/०९/२०२६ सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## : जाहीर नोटीस :

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या आशिलांनी मौजे-पाले तर्फे अष्टमी, ता. रोहा, जि. रायगड येथील १. श्री. उमाजी नारायण खांडेकर, २. श्री गजानन नारायण खांडेकर, ३. सुंद्राबाई नारायण खांडेकर, ४.श्री. चंद्रकांत विठोबा गिजे, ५. पुष्पा विठोबा गिजे, ६. विठोबा गोविंद गिजे, ७. श्री. राजेश गोटीराम खांडेकर, ८. शारदा गोटिराम खांडेकर, ९. सानिका संदीप गजमल, १०. गुलाब हिरामण खांडेकर, ११. श्री.मंगेश हिरामण खांडेकर, १२. श्री. महेश हिरामण खांडेकर, १३. समृद्धी सुनील नावले, १४. मंजुळा संतोष मांचेकर, १५.मिनाक्षी सोपान म्हसकर यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमिन मिळकत खरेदी करण्याचे ठरवले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पाले तर्फे अष्टमी, ता.रोहा, जि.रायगड | २४१ | क्षेत्र ४-७२-००<br>पो.ख.२-१५-००<br>एकूण ६-८७-०० | ३.१८ |

वरील मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र : ६-८७-०० हे. आर. ही मिळकत.

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबेकब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागावून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग सही /-
दिनांक :- ०७/०९/२०२६
**अॅड. नितेश पी.ठाकूर**
मो. ८९८३४५८३६०
(कार्यालयीन पत्ता : ठाकूर अँड असोसिएटस, ए-२०३, वसंतपुष्प को. ऑप. हौ. सो.लि.अलिबाग-रायगड)

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# सात्विक-चिराग बनले चायना मास्टर्स

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताची स्टार बॅडमिंटन जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी चायना मास्टर्सचे विजेतेपद पटकावून इतिहास रचला. अंतिम सामन्यात त्यांनी चिनी जोडी हे जी टिंग आणि रेन शियांग यू यांचा ११-२१, २१-१३, २१-१७ असा पराभव केला. पहिला सेट गमावल्यानंतर, भारतीय जोडीने शानदार कमबॅक करत पुढील दोन सेट जिंकून सामना आपल्या नावावर केला.




या विजयासह, या भारतीय जोडीने या स्पर्धेतील मागील दोन अंतिम सामन्यांमधील निराशाही मागे टाकली. यापूर्वी सात्विक-चिराग यांनी उपांत्य फेरीत मलेशियाची जोडी नूर मोहम्मद अझरीन अयुब आणि टॅन वी किओंग यांचा पराभव केला होता.

## जी टिंग-रेन शियांग यूचा दारुण पराभव

अंतिम सामन्याच्या सुरुवातीला, हे जी टिंग आणि रेन शियांग यू या चिनी जोडीने आक्रमक खेळ केला. त्यांनी सात्विक आणि चिराग यांना कोणतीही संधी न देता पहिला सेट २१-११ ने सहज जिंकला. मात्र, पहिला सेट गमावल्यानंतरही भारतीय जोडीने हार मानली नाही. दुसऱ्या सेटमध्ये, सात्विक आणि चिराग यांनी उत्कृष्ट कौशल्य आणि बुद्धिमत्तेने खेळ करत प्रतिस्पर्ध्यांवर दबाव आणला. यामुळे, त्यांनी दुसरा सेट २१-१३ ने जिंकून सामना १-१ असा बरोबरीत आणला.

### तिसऱ्या सेटमध्ये दमदार कामगिरी

तिसऱ्या आणि अंतिम सेटमध्ये दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. परंतु भारतीय जोडीने निर्णायक क्षणी आपला संयम राखला. सात्विक आणि चिराग यांनी सामन्याचा दबाव हाताळत २१-१७ ने सेट जिंकला. या विजयासोबतच त्यांनी चायना मास्टर्स ट्रॉफीही आपल्या नावावर केली. या विजयामुळे २०२३ आणि २०२५ च्या अंतिम सामन्यांमधील पराभवाची निराशाही मागे टाकून सात्विक आणि चिराग यांनी अखेर विजेतेपदाची ट्रॉफी उंचावली.

### २०२३ आणि २०२५ मध्येही गाठली होती अंतिम फेरी

चायना मास्टर्स ही स्पर्धा सात्विक आणि चिरागसाठी नेहमीच एक आव्हानात्मक स्पर्धा राहिली आहे. या भारतीय जोडीने यापूर्वी २०२३ आणि २०२५ मध्ये अंतिम फेरी गाठली होती. परंतु दोन्ही वेळा त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम फेरीत त्यांचा सामना यजमान चिनी जोडीशी झाला, परंतु सात्विक आणि चिरागने दबावाखाली शानदार पुनरागमन करत विजेतेपद पटकावले. चिनी भूमीवरील हा विजय या भारतीय जोडीसाठी ऐतिहासिक ठरला आहे.

# निवडक



## भारत-जपानमध्ये रंगणार टी-२०

**नवी दिल्ली:** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने एक मोठी घोषणा केली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील अभियानाला सुरुवात करण्यापूर्वी भारतीय पुरुष क्रिकेट संघ जपानविरुद्ध ऐतिहासिक टी-२० सामना खेळणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा पहिला सामना २८ सप्टेंबर रोजी होणार असून, त्याआधी २२ सप्टेंबरला भारत आणि जपान यांच्यात हा सामना रंगणार आहे. भारत आणि जपान यांच्यातील राजकिय संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने हा ऐतिहासिक टी-२० सामना आयोजित करण्यात येत आहे. मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी जपानमधील टोचिगी प्रांतातील सानो इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंडवर हा सामना खेळवण्यात येणार असून भारतीय वेळेनुसार सामन्याला सकाळी ९.३० वाजता या सामन्याची सुरुवात होईल. भारत-जपान यांच्यातील हा सामना स्पोर्ट ७५ या नव्या उपक्रमाचा भाग आहे. सचिव देवजीत सैकिया यांनी भारतीय क्रिकेट संघ जपानमध्ये जाऊन हा टी-२० सामना खेळणार असल्याबद्दल आनंद आणि अभिमान व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, जपान आणि पूर्व आशियातील इतर भागांमध्ये क्रिकेट लोकप्रिय करण्यासाठी हा सामना एक शानदार संधी ठरणार आहे.

## मलेशियावर दणदणीत विजय

**मोकी:** भारताच्या ज्युनियर महिला हॉकी संघाने आशियाई करंडकात मलेशियाचा ११-१ असा धुव्वा उडवला. भारताच्या ज्युनियर पुरुष हॉकी संघाने जपानला ३-३ अशा बरोबरीत रोखले. ज्युनियर हॉकी आशियाई करंडक चीनमधील मोकी येथे सुरू आहे.भारताच्या महिला हॉकी संघाने एलिट गटातील पहिला सामन्यात दक्षिण कोरियाला ४-१ असे पराभूत केले होते. त्यानंतर आता मलेशियावर ११-१ असा विजय साकारला. भारतीय महिला संघाकडून पूजा साहू, पौर्णिमा यादव, गीता व सानिका माने यांनी प्रत्येकी दोन गोल केले. बिनिमा दन, कृष्णा शर्मा, सुखवीर कौर यांनी प्रत्येकी एक गोल केला.दरम्यान, भारताच्या पुरुष हॉकी संघाने अ गटातील पहिल्या सामन्यात इंडोनेशियावर १४-० अशी मात केली होती. जपानविरुद्ध भारताने सामन्याची जोरदार सुरुवात केली. चौथ्या मिनिटाला फाऊलमुळे भारताला पेनल्टी स्ट्रोक मिळाला. कर्णधार अनमोल एक्काने ही संधी साधत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. दहाव्या मिनिटाला भारताने आघाडी २-० केली. आशू मौर्याने पेनल्टी कॉर्नरवरून गोल केला. यानंतर लगेचच ११व्या मिनिटाला जपानला पेनल्टी कॉर्नर मिळाला. र्युशिन सासाकीने गोल करत जपानची पिछाडी १-२ अशी कमी केली.दुसऱ्या खंडामध्ये दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केला. भारताला आघाडी वाढवायची होती, तर जपानला बरोबरी साधायची होती, मात्र दोन्ही संघांच्या बचावफळींनी चांगला खेळ केला. त्यामुळे मध्यंतराला भारत २-१ ने आघाडीवर होता.जपानसाठी महत्त्वपूर्ण गोलतिसऱ्या खंडामध्ये दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत झाली. जपानला पेनल्टी कॉर्नरची संधी मिळाली, मात्र त्यांना त्याचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही.

## आशिया कपमध्ये पुन्हा महामुकाबला!

**दुबई** : दुबईमध्ये सुरू असलेल्या महिला आशिया कप स्पर्धेत भारतीय संघाचे वर्चस्व कायम आहे. टीम इंडियाने गट फेरीत सलग तीन सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. भारतीय संघाने थायलंड, हाँगकाँग आणि पाकिस्तानचा दारुण पराभव केला. या तिन्ही सामन्यात भारताने एकतर्फी विजय मिळवला आहे. आता पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होण्याची शक्यता आहे. भारत अ गटात अव्वल स्थानावर आहे, तर श्रीलंका ब गटात अव्वल संघ आहे. अपेक्षेप्रमाणे, अ गटातून उपांत्य फेरीत पोहोचणारा पाकिस्तान हा दुसरा संघ असेल. उपांत्य फेरीसाठी पात्र ठरण्याकरिता पाकिस्तानला हाँगकाँगविरुद्ध विजय मिळवणे आवश्यक आहे. ब गटातून उपांत्य फेरीत पोहोचणारा बांग्लादेश हा दुसरा संघ असेल. याची लवकरच पुष्टी होईल. या संदर्भात, भारताचा उपांत्य फेरीचा सामना बांग्लादेशविरुद्ध होईल. दुसरा उपांत्य सामना श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यात होईल. हे स्पष्ट आहे की भारत आणि पाकिस्तान यांच्यात उपांत्य फेरीचा सामना होणार नाही. १३ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होण्याची शक्यता आहे. जर भारत आणि पाकिस्तानने आपापले उपांत्य फेरीचे सामने जिंकले, तर एक चुरशीची लढत पाहायला मिळू शकते. मात्र, उपांत्य फेरी गाठण्यासाठी पाकिस्तानला खूप मेहनत करावी लागेल.

# भारतात येणाऱ्या ब्राझील संघाची घोषणा

## २६ खेळाडू निवडले जाणार; ३ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथे होणार सामना

| ब्राझील | वृत्तसंस्था |

ब्राझीलच्या पुरुष फुटबॉल संघाचे प्रशिक्षक कार्लो एंसेलोटी ९ सप्टेंबर रोजी भारतासोबत होणाऱ्या फिफा आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यासाठी २६ सदस्यीय संघाची घोषणा करतील. ब्राझिलियन फुटबॉल कॉन्फेडरेशनने २ सप्टेंबर रोजी ही माहिती दिली.

भारत आणि ब्राझील यांच्यातील सामना ३ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये खेळला जाईल. भारताने ३१ ऑगस्ट रोजी आपला संघ घोषित केला आहे, परंतु ब्राझीलमधून भारतात येणाऱ्या खेळाडूंची नावे अद्याप



समोर आलेली नाहीत.

नुसार, एंसेलोटी ९ सप्टेंबर रोजी ब्राझीलिया वेळेनुसार दुपारी ३ वाजता २६ खेळाडूंची नावे घोषित करतील. हाच संघ सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या ब्राझीलच्या तीन आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यांमध्ये खेळेल. ब्राझील २५ सप्टेंबर आणि २९ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने खेळेल. त्यानंतर ३ ऑक्टोबर रोजी भारताशी भिडेल.ब्राझीलने आपला मागील आंतरराष्ट्रीय सामना जुलै २०२६ मध्ये फिफा वर्ल्ड कपच्या राउंड ऑफ-१६ मध्ये नॉर्वेविरुद्ध खेळला होता. नॉर्वेने ब्राझीलला २-१ ने हरवून स्पर्धेतून बाहेर काढले होते.

या सामन्यात विनिसियस ज्युनियर, एलिसन बेकर, मारक्विन्होस, नेमार ज्युनियर, कासेमिरो आणि एंड्रिक यांसारखे खेळाडू ब्राझील संघाचा भाग होते. यापैकी किती खेळाडू भारताच्या विरुद्धच्या सामन्यासाठी निवडले जातील, हे ९ सप्टेंबर रोजी संघाच्या घोषणेनंतरच स्पष्ट होईल.भारताला या आंतरराष्ट्रीय विंडोमध्ये ब्राझीलव्यतिरिक्त आणखी दोन मैत्रीपूर्ण सामने खेळायचे आहेत. संघ २५ सप्टेंबरला बेंगळुरूमध्ये पनामाचा सामना करेल. त्यानंतर ६ ऑक्टोबरला कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दोन वेळा फिफा वर्ल्ड कप विजेत्या उरुग्वेविरुद्ध खेळेल.

# ब्रायडन श्रीलंका मालिकेतून बाहेर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्सला श्रीलंकेविरुद्धच्या व्हाईट-बॉल मालिकेसाठी संघात समाविष्ट करण्यात आले नाही. कार्स निवडीसाठी उपलब्ध होता, परंतु इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डने डर्बी येथील घटनेनंतर त्याला संघातून वगळण्याचा निर्णय घेतला.



इएसबीने सांगितले की, कार्सला मैदानाबाहेरील वादाशी संबंधित मुद्द्यांवर काम करण्यासाठी आणि स्वतःला पुन्हा व्यवस्थित करण्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. बोर्डाने हे देखील स्पष्ट केले की, हा निर्णय कोणत्याही चौकशीच्या निकालावर पूर्वग्रहदूषितपणे घेण्यात आला नाही. कार्सला डरहमसोबत काउंटी चॅम्पियनशिपमधील विजयाचा जल्लोष करत असताना डर्बी येथील एका बारबाहेर कथितरित्या दारूच्या नशेत गोंधळ घातल्याच्या संशयावरून काही काळासाठी अटक करण्यात आली होती.

त्यानंतर त्याला इंग्लंडच्या कसोटी संघातून वगळण्यात आले. डर्बीशायर पोलिसांनी आता या घटनेशी संबंधित कथित मारहाणीच्या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. तथापि, या प्रकरणात कार्सची काही भूमिका होती की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# ईशानचे ऐतिहासिक द्विशतक

| मुंबई | प्रतिनिधी |

दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना सध्या चेन्नईमध्ये ईस्ट झोन आणि साऊथ झोन यांच्यात खेळला जात आहे. दुसऱ्या दिवशी, ईस्ट झोन चा कर्णधार ईशान किशनने द्विशतक झळकावून इतिहास रचला.

त्याने दमदार खेळी करून ईस्ट झोनला मजबूत स्थितीत आणले. या ऐतिहासिक खेळीच्या जोरावर किशनने भारतीय संघात दार ठोठावले आहे. किशनने २६ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २७० चेंडूंमध्ये आपले द्विशतक पूर्ण केले.

दुसऱ्या दिवशी, किशन आणि कुशाग्र यांनी आपला डाव पुढे चालू ठेवला. साऊथ झोनच्या गोलंदाजांना त्यांनी चागंलेच धुतले. कुशाग्रने १३२ चेंडूंमध्ये १०१ धावा करून शानदार शतक ठोकले. परंतु, यानंतर लगेच तिरुपुरना विजयने त्याची विकेट घेतली. ईशानने त्याला चांगली साथ दिली. दोघांनी मिळून २३० धावांची भागीदारी केली. ईशानने आपला डाव पुढे चालू ठेवत धमाकेदार द्विशतक झळकावले.

# युपी टी २० लीगमध्ये रिंकू सिंहचा जलवा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

यूपी टी २०लीग २०२६ च्या अंतिम सामन्यात, रिंकू सिंगच्या नेतृत्वाखालील मेरठ मॅव्हरिक्सने भुवनेश्वर कुमारच्या लखनौ फाल्कन्सला एकतर्फी सामन्यात ९४ धावांनी पराभूत केले.

मेरठने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले आणि आपला पहिला अंतिम सामना खेळणाऱ्या लखनौला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. विशेष म्हणजे, मेरठने या लीगच्या अंतिम फेरीत सलग चौथ्यांदा प्रवेश



केला आहे. रिंकू सिंगने यापूर्वी दुलीप ट्रॉफीमध्ये उपकर्णधारपद भूषवले होते.

मेरठ मॅव्हरिक्सचा कर्णधार रिंकू सिंगने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीर स्वस्तिक चिकारा आणि दिव्यांश जोशी यांनी ५३ धावांची वेगवान सलामीची भागीदारी रचली. यानंतर, सलामीवीर दिव्यांश जोशीने धडाकेबाज कामगिरी करत लखनौच्या गोलंदाजांची धुलाई केली. त्याने अनुभवी गोलंदाज भुवनेश्वर कुमारसह संपूर्ण संघावर हल्ला चढवला आणि अवघ्या ४० चेंडूंमध्ये १०५ धावांचे झंझावाती शतक ठोकले. जोशीच्या शानदार शतकामुळे, मेरठ मॅव्हरिक्सने आपल्या २० षटकांत ७ गडी गमावून २०३ धावांची भक्कम धावसंख्या उभारली.

२०४ धावांच्या विशाल लक्ष्यासमोर लखनौ फाल्कन्सची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली आणि ते सुरुवातीपासूनच बॅकफूटवर होते. एमडी सैफ, हिमांशू सिंग आणि आराध्या यादव यांसारखे प्रमुख फलंदाज लवकर बाद झाले. मधल्या फळीत, अजित वर्माने ३९ धावा करून थोडा प्रतिकार दाखवला आणि कृतज्ञ कुमार सिंगने २१ धावांची भर घातली, परंतु संघाला सामन्यात परत आणण्यासाठी हे प्रयत्न अपुरे ठरले.

## खराब फॉर्म असूनही लाबुशेनवर विश्वास

**केप टाऊन** : लाबुशेनला खराब फॉर्म असूनही दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाच्या १६ सदस्यीय संघात कायम ठेवण्यात आले आहे.बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेत कमी धावा करणाऱ्या लाबुशेनच्या निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. परंतु निवडकर्त्यांनी फलंदाजावर आपला विश्वास कायम ठेवला.

## महिला आशिया कपमध्ये श्रीलंका उपांत्य फेरीत

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

दुबईत महिला आशिया कपच्या ग्रुप-बी सामन्यात श्रीलंकेने बांगलादेशला ४ गडी राखून हरवून उपांत्य फेरीत स्थान मिळवले. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गडी गमावून ११४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेने १९.२ षटकांत ६ गडी गमावून ११५ धावा करत सामना जिंकला.

हर्षिता समरविक्रमाने दबावाखाली ३७ चेंडूंमध्ये नाबाद ४८ धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.श्रीलंकेने ग्रुप-बी मधील आपले सर्व सामने जिंकून अव्वल स्थान पटकावले. आता तो उपांत्य फेरीत ग्रुप-ए मध्ये दुसऱ्या स्थानावर असलेल्या संघाशी शुक्रवारी खेळेल. ते स्पर्धेचे गतविजेते देखील आहेत.

## अमेरिकन टेनिस स्पर्धा झेंगची मेडिसनवर मात

| न्यूयॉर्क | वृत्तसंस्था |

अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेची तिसरी फ ेरी टेलर फ्रिट्झ, फ्लाविओ कोबोली, मेडिसन कीज या प्रमुख टेनिसपटूंच्या पराभवामुळे धक्कादायक ठरली. मेडिसन कीजचा पराभव चटका लावणारा ठरला. बिगरमानांकित किनवेन झेंग हिने २ तास २८ मिनिटांच्या झुंजीनंतर अक्षरशः विजयाचा घास मेडिसनच्या तोंडून हिरावून घेतला.

५-० अशा आघाडीनंतर मॅच पॉइंटवर असताना अनपेक्षितपणे कीजचे सामन्यावरील नियंत्रण सुटले आणि तिला पराभवाचा सामना करावा लागला. झेंग हिने अखेरच्या निर्णायक सेटमध्ये सलग सात गेम जिंकून लढत जिंकली. हा सामना २ तास २८ मिनिटे



चालला. पहिला सेट सहज जिंकत मेडिसनने आश्वासक सुरुवात केली होती. मात्र, कोपरावरील शस्त्रक्रियेनंतर पुनरागमन करणाऱ्या झेंगने जोरदार खेळ करताना दुसरा सेट टायब्रेकरमध्ये जिंकला आणि त्यानंतर मेडिसनला पुनरागमन करण्याची संधी दिली नाही.

## २० वर्षानंतर आशियाई खेळात ठरली पात्र | अंडर २० आता खेळणार आशिया कप

# भारतीय फुटबॉल टीमची ऐतिहासिक कामगिरी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|

भारतासाठी आता केवळ क्रिकेट हाच एक खेळ मोठा राहिला नाही, तर अनेक खेळांमध्ये भारतीय खेळाडू नाव कमावत आहेत. आता भारताने फुटबॉलमध्ये त्यांच्या गट ब मधील अंतिम पात्रता सामन्यात बांगलादेशला ३-० ने पराभूत केले.



ताश्कंद येथील दोस्तलिक स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या विजयामुळे, भारतीय संघाने एएफसी यू-२० आशियाई कप चीन २०२७ मध्ये आपले स्थान निश्चित केले. या प्रभावी विजयात डॅनी मेईतेई लैश्राम, विशाल यादव आणि मोहम्मद अरबाश यांनी भारतासाठी गोल केले. या विजयामुळे ब्लू कोल्ट्सने २० वर्षांत प्रथमच एएफसी यू-२० आशियाई कपमध्ये आपले स्थान निश्चित केले.

गट ब मध्ये तीन सामन्यांनंतर भारताचे सहा गुण असून तो दुसऱ्या स्थानावर आहे. डॅनीने २५ व्या मिनिटाला भारताचा पहिला गोल केला. त्यानंतर विशालने एका तासाहून अधिक वेळ खेळ सुरू असताना एका शानदार कसरतीने ब्लू कोल्ट्सला दोन गोलची आघाडी मिळवून दिली.

बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या मोहम्मद अरबाशने ७९ व्या मिनिटाला एका जोरदार शॉटने भारताला ३-० अशी आघाडी मिळवून दिली आणि संघाचा विजय निश्चित केला.

डॅनीने सुरुवातीला मोहम्मद अब्दुल रियाद फहीमवर दबाव आणला, ज्यामुळे बांगलादेशी बचावपटूला हातिम अलीकडे सहजपणे चेंडू पास करता आला. भारतीय स्ट्रायकरने उत्कृष्ट प्रसंगावधान दाखवत बॉक्समध्ये मोकळ्या जागेत उभ्या असलेल्या डॅनीला एक अप्रतिम पास दिला, ज्याने एक उत्कृष्ट गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. अर्ध्या तासानंतर, डॅनीने स्वतःच भारताला २-० ने पुढे नेण्याचा प्रयत्न केला, जेव्हा त्याचा फ्री-किक गोलच्या दिशेने गेला; तथापि, गोलरक्षकाने चपळाई दाखवत तो वाचवला.

दुसऱ्या हाफची सुरुवातही अशाच प्रकारे झाली आणि ब्लू कोल्ट्सने आपले हल्ले सुरूच ठेवले. जवळपास एक तासाच्या खेळानंतर, ऋषिकांतने एक संधी निर्माण केली, जेव्हा बॉक्समधील एक लांब थ्रो विशालच्या दिशेने आला. विशालने एक नेत्रदीपक कसरत दाखवत गोल केला आणि संघाची आघाडी दुप्पट केली.बांगलादेशने संधी शोधण्याचा प्रयत्न केला आणि शेवटच्या अर्ध्या तासात आक्रमक खेळ केला, परंतु ते भारतीय बचाव भेदण्यात अयशस्वी ठरले. भारताने ७२व्या मिनिटाला डॅनी आणि विशाल यांच्या जागी मोहम्मद अरबाश आणि प्रशांत जाजो यांना मैदानात उतरवून बदल केला.

मैदानात येताच अरबाशने जबरदस्त खेळ केला; त्याने डाव्या पायाने एक जोरदार शॉट मारून चेंडू थेट जाळ्याच्या वरच्या भागात धाडला आणि भारताला ३-० अशी आघाडी मिळवून दिली.

# नेहरू हॉकी स्पर्धेत सहकार विद्या मंदिरचा दबदबा!

| बुलढाणा | वृत्तसंस्था |

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय नेहरू हॉकी क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. चिखली रोडवरील सहकार विद्या मंदिर येथे झालेल्या या स्पर्धेत १५ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले आणि १७ वर्षांखालील मुलींच्या गटात जिल्ह्यातील एकूण १० संघांनी सहभाग घेतला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमलजी झंवर, राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉ. विजय धनावत, बुलढाणा जिल्हा हॉकी संघटनेचे सचिव प्रकाश खेत्रे, सहकार विद्या मंदिरचे क्रीडा विभाग प्रमुख सय्यद आबिद यांच्यासह सहभागी संघांचे क्रीडा शिक्षक, पालक, खेळाडू आणि पंच उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी तसेच उपस्थित क्रीडा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. १५ वर्षांखालील मुलांच्या गटात सहकार विद्या मंदिर, बुलढाणा संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर लोणार सेंट्रल पब्लिक स्कूल, लोणार संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील मुलांच्या गटातही सहकार विद्या मंदिर संघाने बाजी मारत विजेतेपद पटकावले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)